दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–५८ | शनिवार, दि.२१ जुन २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### राज्यांची रचना भाषावार तर इतर भाषेची सक्ती का?

इयत्ता पहिली ते तिसरीपर्यंत हिंदी भाषा 'अनिवार्य' नसेल, मात्र तिसऱ्या भाषेच्या रूपात ती शिकवली जाणार आहे. यासाठी शालेय शिक्षण विभागाने नवा शासकीय निर्णय जारी केला आहे. त्यामुळे तिसरी भाषा हिंदीच राहणार असून, राज्य सरकारच्या या नव्या 'जीआर'बद्दल मराठी भाषातज्ज्ञांनी संताप व्यक्त केला आहे. हिंदीऐवजी इतर तृतीय भाषा शिकण्याकरिता किमान २० विद्यार्थ्यांनी इच्छा दर्शविल्यास, ती भाषा त्यांना शिकवण्यात येणार आहे. मात्र, ती तिसरी भाषा शिकवणारा शिक्षक त्या शाळेत नसेल तर सदर भाषा ही ऑनलाईन पद्धतीने शिकवण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.

### अहमदाबाद विमान दुर्घटनेतील २२० प्रवाशांच्या मृतदेहाची ओळख पटली

अहमदाबाद । वृत्तसंस्था

गुजरात मधील अहमदाबादहून लंडनला जाणारे एअर इंडियाचे विमान कोसळण्याच्या घटनेला आठ दिवस होवून गेले. या विमान अपघातात दुर्घटनेतील प्रवाशांचे मृतदेह इतके जळाले होते की, त्यांचे मृतदेहही ओळखण्यापलिकडे गेले होते. आता पर्यंत डीएनए मार्फत जवळपास २२० मृतदेहांची ओळख पटविण्यात आली आहे. तर २०२ जणांचे अवशेष प्रवाशांच्या कुटुंबियांच्या नातेवाईकांकडे हस्तांतरींत करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. राज्याचे आरोग्यमंत्री ऋषिकेश पटेल म्हणाले, आतापर्यंत २२० डीएनए नमुने जुळले आहेत आणि या बळींच्या नातेवाईकांशी संपर्क साधण्यात आला आहे. २०२ जणांचे अवशेष त्यांच्या कुटुंबियांना परत करण्यात आले आहेत, तर इतरांची ओळख पटवण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# सातबारासह जमीनीचे इतर कागदपत्रे मिळणार व्हाट्सअॅपवर

## शेतकरी हितासाठी शासनाचे महत्वपुर्ण पाऊल

पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील शेतकरी आणि जमीनधारक नागरिकांसाठी एक अत्यंत महत्त्वाची आणि क्रांतिकारी सुविधा आता सुरू झाली आहे. भूमी अभिलेख विभागाने डिजिटल युगाच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलत आता सातबारा, ८ अ उतारा, फेरफार दाखले, ई–रेकॉर्ड यांसारखी महत्त्वाची जमीनविषयक कागदपत्रे थेट नागरिकांच्या व्हॉट्सअॅपवर पाठवण्याची सुविधा सुरू केली आहे. यामुळे शेतकऱ्यांना किंवा इतर नागरिकांना सेतू केंद्रे, महा–ई सेवा केंद्रे, किंवा खासगी एजंटांकडे जाऊन पैसे खर्च करण्याची



गरज भासणार नाही. ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक, स्वस्त आणि अत्यंत सोपी असून, प्रत्येकाच्या हातात असलेल्या स्मार्टफोनद्वारे ◀◀ पान २ वर

### माहिती, सुविधा अन् सूचना या तीन पद्धतीने काम

'माहिती' या विभागातून नागरिकांना भूमी अभिलेखाशी संबंधित कायदे, प्रक्रिया, फेरफार कसे करावेत, कोणते कागदपत्र कशासाठी उपयोगी आहे याविषयी त्वरित प्रश्नोत्तराच्या स्वरूपात माहिती मिळणार आहे. 'सुविधा' या विभागामध्ये सातबारा, ८ अ उतारा, फेरफार नोंदी आणि ई–रेकॉर्ड यासारखी कागदपत्रे व्हॉट्सअॅपवर थेट डाऊनलोड करता येणार आहेत. यामुळे कार्यालयात रांगा लावण्याची गरज राहणार नाही, आणि वेळेची तसेच श्रमांची बचत होईल. 'सूचना' या विभागात, जर जमीन नोंदवहीत कोणताही बदल झाला असेल, तर त्याची माहिती थेट मालकाला व्हॉट्सअॅपवर मिळेल. म्हणजे, फेरफार कोणतीही तृतीयपक्षीय मदत किंवा एजंट न घेता शेतकऱ्याला स्वतः लक्ष ठेवता येईल.

### ५ जुलैपासून होणार सुरूवात

ही नवी सेवा प्रायोगिक तत्त्वावर १५ जुलैपासून सुरु होणार असून, १ ऑगस्टपासून ती राज्यभरात सर्वसामान्यांसाठी उपलब्ध होणार आहे. यामध्ये डिजिटल इंडिया अभियानाला प्रोत्साहन देण्यासोबतच, भ्रष्टाचाराला रोख, शासकीय प्रक्रियेत पारदर्शकता आणि ग्रामीण भागात तांत्रिक सक्षमीकरण साध्य होणार आहे. प्रभारी अतिरिक्त जमाबंदी आयुक्त सरिता नरके यांनी यासंबंधी माहिती दिली आहे. या सुविधेमुळे राज्यातील लाखो शेतकरी आणि जमीनधारकांना त्यांच्या हक्काचे कागदपत्र वेळेवर आणि विश्वासार्हपणे मिळतील. या प्रणालीमुळे सरकार आणि नागरिक यांच्यातील दुवा अधिक सक्षम आणि पारदर्शक होईल.

## थोडक्यात...

### कैलास मानसरोवर यात्रेसाठी यात्रेकरूंचा पहिला गट रवाना

नवी दिल्ली–सिक्कीमचे राज्यपाल ओम प्रकाश माथूर यांनी नाथूला येथे कैलास मानसरोवर यात्रा २०२५ साठी यात्रेकरूंच्या पहिल्या तुकडीला हिरवा झेंडा दाखवला आहे.

### कोकण किनाऱ्यावर उंच लाटांचा इशारा

रायगड–महाराष्ट्रात मान्सून सक्रिय होताच, राज्यातील अनेक भागात मुसळधार पाऊस सुरू झाला आहे. भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती सेवा केंद्राने कोकण किनाऱ्यावर उंच लाटा उसळण्याचा इशारा दिला आहे. याअंतर्गत, मच्छीमार आणि लहान बोटींना पुढील काही दिवस समुद्रात जाऊ नये अशा सक्त सूचना देण्यात आल्या आहेत.

### बारामतीमधील कार्यक्रमाला अजित पवारांची अनुपस्थिती

बारामती–राष्ट्रवादीचा एक कार्यक्रम बारामतीत आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला अजित पवारांची मात्र अनुपस्थिती होती. याबद्दल सुप्रिया सुळेंना विचारले असता त्यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले की, दादा या कार्यक्रमाला न येण्यामागचे कारण मला माहित नाही. आणि सर्वच गोष्टी कॅमेऱ्यासमोर बोलायच्या नसतात, असे त्यांनी म्हटले आहे.

### आषाढी वारीसाठी भीमा नदीत पाणी सोडणार

पंढरपूर–आषाढी वारीच्या सोहळ्यासाठी उजनी धरणातून १६०० क्युसेक्सने उजनी धरणातून भीमा नदीत पाणी सोडले जाणार आहे. भिमा नदीत (चंद्रभागेत) उजनीतून पाण्याचा विसर्ग सोडला जाणार आहे. आषाढी वारीच्या सोहळ्यासाठी आलेले वारकरी चंद्रभागा नदीत स्नान करुनच वारी पूर्ण करतात.

### विराज आणि सत्यजित देशमुख यांचा सैनिकी शाळेत प्रवेश

बीड–मस्साजोगचे माजी सरपंच संतोष देशमुख यांच्या मुलासह पुतण्याचा सांगलीच्या रेठरे धरण येथील सैनिकी शाळेमध्ये शुक्रवारी प्रवेश पार पडला, मोठ्या जल्लोषांमध्ये संतोष देशमुख यांचा मुलगा विराज आणि पुतण्या सत्यजित देशमुख सह देशमुख कुटुंबाचे स्वागत करण्यात आले. यावेळी संतोष देशमुख यांच्या पत्नी मुलगी भाऊ आणि बहिणीचा इतर कुटुंब देखील उपस्थित होते. फुलांचा वर्षाव करत आणि झांज पथकांच्या निनादात आमदार सदाभाऊ खोत यांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आले आहे.

### टोकवाडी गावकऱ्यांच्या वतीने रस्ता रोको

परळी–बीड ते परळी राष्ट्रीय महामार्गावर टोकवाडी गावकऱ्यांच्या वतीने टोकवाडी गावामध्ये गतिरोधक बसवावेत या मागणीसाठी गेल्या एक तासापासून रस्ता रोको करण्यात येत आहे. यामध्ये गावकरी मोठ्या संख्येने तसेच महिला सहभागी झाल्या होत्या. यावेळी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

### गोदाघाट परिसरात पुन्हा अलर्ट

नाशिक–गोदाघाट परिसरात पाणी ओसरले असले तरी दुतोंड्या मारुतीच्या पायाजवळ पाणी अजूनही आहे. पावसाची नाशिकमध्ये मध्यरात्री पासून विश्रांती असून शुक्रवारी सकाळी गंगापूर धरणातून पाण्याचा विसर्ग केला जाणार होता. पाण्याचा विसर्ग होणार असल्याने गोदाघाट परिसरात पुन्हा अलर्ट जाहीर करण्यात आला आहे.

### एअर इंडियाची दिल्ली–पुणे फ्लाईट रद्द

नवी दिल्ली : एअर इंडियाची दिल्ली–पुणे फ्लाईट रद्द करण्यात आली असून बर्ड स्ट्राईकमुळे दिल्ली–पुणे फ्लाईट रद्द करण्यात आली. दरम्यान विमानातील सर्व प्रवासी सुरक्षित असून विमानाची सर्वंकष तपासणी सुरू आहे.

### आतापर्यंतचा सगळ्यात मोठा सायबर दरोडा

नवी दिल्ली : तुमचे फेसबुक, गुगल आणि अॅपल अकाऊंट हॅक तर झाले नाही ना..कारण नुकताच एक धक्कादायक अहवाल समोर आला आहे, त्यानुसार १६ अब्ज लोकांचे पासवर्ड आणि लॉग–इन क्रेडेंशिअल्स चोरण्यात आले आहेत. हा आतापर्यंतचा सगळ्यात मोठा सायबर दरोडा आहे. त्यामुळे गुगल, फेसबुक आणि अॅपल सारख्या कंपन्यांचे अकाऊंट खरोखर सुरक्षित आहेत की नाहीत ? हा विचार करण्यास लोकांना आता यामुळे भाग पडले आहे.

# माजी मंत्री धनंजय मुंडेंना हायकोर्टाचा मोठा दणका!

## पोटगीतील ५० टक्के रक्कम तातडीने न्यायालयात जमा करण्याचे निर्देश

पुणे । प्रतिनिधी

राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांना मुंबई उच्च न्यायालयाने मोठा दणका दिला आहे. करुणा शर्मा यांना लागू झालेल्या पोटगीतील ५० टक्के रक्कम चार आठवड्यात न्यायालयात जमा करण्याचे निर्देश दिले आहेत.





करुणा मुंडे यांना वांद्रे कौटुंबिक न्यायालयाने १ लाख २५ हजार रुपये दरमहा पोटगी मंजूर केली होती. या विरोधात धनंजय मुंडे यांनी हायकोर्टात धाव घेतली होती. मात्र हायकोर्टाने पोटगीची ५० टक्के रक्कम ही चार आठवड्यात न्यायालयात जमा करण्याचे निर्देश धनंजय मुंडे यांना दिले आहेत. न्यायमूर्ती ◀◀ पान २ वर

# गरिबांच्या मुलांनी इंग्रजी भाषा शिकावी असे भाजप, आरएसएसला वाटत नाही; राहुल गांधींची टीका

नवी दिल्ली । वृत्तसेवा

**देशात पुन्हा एकदा भाषा विषयक वाद उफाळून आला आहे. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी शुक्रवारी इंग्रजी भाषेच्या महत्त्वावर जोर देत भाजप–आरएसएसवर टीका केली. त्यांनी म्हटले की, इंग्रजी ही लाजेची बाब नाही, ती एक शक्ती आहे. भाजपा–आरएसएस गरीब मुलांना इंग्रजी शिकू देत नाहीत, कारण ते त्यांना प्रश्न विचारू देऊ इच्छित नाहीत, समता मिळू देत नाहीत, असे ते म्हणाले.**

राहुल गांधींच्या या विधानानंतर देशातील भाषिक आणि सांस्कृतिक विविधतेचा मुद्दा



पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. त्यांच्या या टीकेचा संदर्भ गृहमंत्री अमित शहा यांच्या एका विधानाशी आहे, ज्यात त्यांनी म्हटले होते की, इंग्रजी बोलणाऱ्यांना लवकरच लाज वाटेल. राहुल गांधी यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे की, इंग्रजी ही बंधन नाही, ती एक पूल आहे. इंग्रजी ही लाज नाही, ती शक्ती आहे. इंग्रजी ही जाळे टाकणारी नाही, तर जंजीर तोडणारी आहे. बीजेपी–आरएसएस गरीब मुलांना इंग्रजी शिकू देत नाहीत, कारण त्यांना समानतेची संधी मिळू नये असे त्यांना वाटते. आजच्या काळात इंग्रजी तितकीच गरजेची आहे जितकी मातृभाषा, कारण ती रोजगार देते, आत्मविश्वास वाढवते. त्यांनी पुढे म्हटले की, ''भारताच्या प्रत्येक भाषेत आत्मा, संस्कृती आणि ज्ञान आहे. त्या जपायच्या आहेत, पण त्याचबरोबर प्रत्येक मुलाला इंग्रजी शिकवली पाहिजे.

# नवगण, विनायक शिक्षण संस्थेच्या सचिवपदी डॉ.योगेश क्षीरसागर

**स्व.केशरकाकूंचा शैक्षणिक वारसा नव्या पिढीकडे; उच्चशिक्षित नेतृत्वाकडे शैक्षणिक संस्थेची धुरा**

बीड । प्रतिनिधी

दि.२० : शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या बीड येथील नवगण शिक्षण संस्था आणि विनायक युवक कल्याण संस्थेच्या सचिवपदी डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांची निवड गुरुवारी (दि.१९) करण्यात आली आहे. त्यांच्या रुपाने उच्चशिक्षित व्यक्तिमत्वाकडे शिक्षण संस्थांची धुरा सोपविण्यात आली असून त्यांचे निवडीबद्दल सर्वस्तरातून अभिनंदन केले जात आहे.



बीडमध्ये नवगण शिक्षण संस्थेची स्थापना १९६३ साली लोकनेत्या व माजी खासदार स्व. केशरकाकू सोनाजीराव क्षीरसागर यांनी केली. त्याकाळी जिल्ह्यातील ग्रामीण व डोंगराळ भागात शिक्षणाच्या सुविधा अत्यंत अपुऱ्या होत्या. ही गरज ओळखून काकूंनी शेतकरी, ऊसतोड कामगार, गरीब व वंचित मुला –मुलींसाठी विविध शाळा व महाविद्यालयांची ◀◀ पान २ वर

# ३३ के.व्ही च्या नवीन लाईनच्या कामाचा आ.संदीप क्षीरसागरांकडून शुभारंभ

## बीड शहर आणि ग्रामीण भागातील वीजेचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागणार

बीड । प्रतिनिधी

बीड शहर आणि ग्रामीण भागातील वीजपुरवठ्याचा भार अत्याधिक असल्याने सातत्याने वीजपुरवठा खंडित होत आहे. यातून मार्ग काढण्यासाठी आ.संदीप क्षीरसागरांच्या पाठपुराव्यातून ३३ के.व्ही. च्या १२ किलोमीटर अंतराच्या नवीन लाईनचे काम मंजूर झाले असून या कामाचे आ.संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.२०) रोजी उद्घाटन करण्यात आले आहे. या कामाला लगेच प्रत्यक्ष ◀◀ पान २ वर



# बँक खातेदारांनो लक्ष द्या; १ जुलैपासून नियम बदलणार!

## अलर्ट : माहिती घेतली नाही तर होईल मोठे नुकसान



मुंबई । प्रतिनिधी

खासगी क्षेत्रातील बँकांच्या दृष्टीने एक महत्वाची बातमी आहे. खासगी बँकांच्या संदर्भातील काही नियम १ जुलैपासून बदलणार आहेत. एकीकडे, एचडीएफसी बँकेने क्रेडिट कार्डबाबत काही नियम बदलले आहेत, तर दुसरीकडे आयसीआयसीआय बँकेने काही व्यवहारांवर आकारले जाणारे शुल्कही बदलले आहे.

जर तुम्ही एचडीएफसी बँकेच्या क्रेडिट कार्डचा वापर करुन एमपीएल, ड्रीम ११ सारख्या गेमिंग अॅप्सवर दरमहा १० हजार रुपयांपेक्षा जास्त खर्च केला तर तुम्हाला त्यावर एक टक्क्यांपेक्षा जास्त शुल्क भरावे लागेल. त्याचप्रमाणे, जर तुम्ही मोबिक्विक, पेटीएम, ओला मनी आणि फ्रीचार्ज सारख्या थर्ड पार्टी वॉलेटवर महिन्यात दहा हजार रुपयांपेक्षा जास्त पैसे ठेवले तर त्यावरही एक टक्के शुल्क आकारले जाईल. जर तुम्ही इंधनावर ◀◀ पान २ वर

# घर म्हणजे केवळ भिंती नव्हे तर स्वप्नांचा किल्ला– सरन्यायाधीश

नवी दिल्ली । वृत्तसेवा

भारताचे सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी इटलीतील मिलान कोर्ट ऑफ अपील येथे उपस्थित न्यायाधीशांसमोर भारताच्या संविधानाच्या ७५ वर्षांच्या प्रवासावर भाष्य केले. यावेळी सर्वोच्च न्यायालयाच्या सामाजिक व आर्थिक न्याय देण्याच्या भूमिकेचे महत्व त्यांनी अधोरेखित केले. त्यांनी 'बुलडोझर न्याय' रोखणाऱ्या

### 'बुलडोझर न्याय'वर सर्वोच्च न्यायालयाचा आळा

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा उल्लेख करत सांगितले की,

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१९ जुन २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३७.५० क्विंटल | १,७४१ | २,६३० | २,३०५ |
| ज्वारी/हायब्रिड: ५८.०० क्विंटल | २,२०३ | २,८७४ | २,५६९ |
| मका/लोकल:२१.००क्विंटल | २,२०० | २,४०० | २,२६६ |
| तूर : ३०.०० क्विंटल | ६,०५० | ६,५६५ | ६,३१५ |
| उडीद : ०.५० क्विंटल | ६,४४१ | ६,४४१ | ६,४४१ |
| बाजरी: २९.०० क्विंटल | १,८५१ | २,७०० | २,३४१ |
| मुग :१.०० क्विंटल | ५,००० | ६,२०० | ५,६०० |
| सोयाबीन:४८.५० क्विंटल | ४,२७५ | ४,३११ | ४,२९३ |
| हरभरा:२१.०० क्विंटल | ३,४०० | ५,४०० | ५,०८७ |

# बंदोबस्ताच्या नियोजनात खाकीचे मोठे पाऊल

## पोलिस अधिक्षक नवणीत काँवत यांनी अधिकाराचे केले विकेंद्रीकरण



बीड । प्रतिनिधी

**जिल्ह्यात कोणत्याही भागात मोठ्या नेत्यांच्या सभा, धार्मिक कार्यक्रम, तणावपुर्ण परिस्थिती यासह वेगवेगळ्या कारणासाठी पोलिस बंदोबस्त हा पोलिस पोलिस अधिक्षकांच्या आदेशाने दिला जात होता. मात्र पोलिस अधिक्षक नवणीत काँवत यांनी बंदोबस्त यशस्वीरित्या पार पडावा आणि पोलिस कर्मचाऱ्यांची धावपळ होऊ नये यासाठी अधिकाराचे विकेंद्रीकरण केले आहे. बंदोबस्ताचे अधिकार हे अप्पर पोलिस अधिक्षकांना दिले आहेत.**

आजकाल कोणत्याही



कारणासाठी पोलिस बंदोबस्त असावा, असे प्रत्येकाला वाटत असते. मात्र यात पोलिस कर्मचाऱ्यांची धावपळ आणि नियोजनात गोंधळ होत असल्याचे अनेक वेळा दिसून आलेले आहे. पुर्वी बंदोबस्त हा पोलिस अधिक्षकांच्या आदेशाने दिला जात होता. मुख्यालयातून पोलिस कर्मचारी पाठवण्यात येत होते. मात्र पोलिस अधिक्षक नवणीत काँवत यांनी बंदोबस्तासंदर्भातील अधिकाराचे विकेंद्रीकरण केले असून आता पोलिस ◀◀ पान २ वर

### पोलिस पेट्रोल पंपावर सीएनजी, ईलेक्ट्रिक चार्जिंग स्टेशन होणार

**बीड शहरात अहिल्यानगर रस्त्यावर बालेपीरला पोलिस पेट्रोल पंप असून त्यास बीडकरांचा चांगला प्रतिसाद आहे. आता याच पंपावर सीएनजी स्टेशन तसेच ईलेक्ट्रिक चार्जिंग स्टेशन उभारण्याचा विचार असल्याचे पोलिस अधिक्षक नवणीत काँवत यांनी सांगितले.**



## अग्रलेख

# राज्यांची रचना भाषावार तर इतर भाषेची सक्ती का ?

इयत्ता पहिली ते तिसरीपर्यंत हिंदी भाषा 'अनिवार्य' नसेल, मात्र तिसऱ्या भाषेच्या रूपात ती शिकवली जाणार आहे. यासाठी शालेय शिक्षण विभागाने नवा शासकीय निर्णय जारी केला आहे. त्यामुळे तिसरी भाषा हिंदीच राहणार असून, राज्य सरकारच्या या नव्या 'जीआर'बद्दल मराठी भाषातज्ज्ञांनी संताप व्यक्त केला आहे. हिंदीऐवजी इतर तृतीय भाषा शिकण्याकरिता किमान २० विद्यार्थ्यांनी इच्छा दर्शविल्यास, ती भाषा त्यांना शिकवण्यात येणार आहे. मात्र, ती तिसरी भाषा शिकवणारा शिक्षक त्या शाळेत नसेल तर सदर भाषा ही ऑनलाईन पद्धतीने शिकवण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषा ही अनिवार्य असेल, असेही शालेय शिक्षण विभागाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. राज्य शालेय आराखड्याद्वारे तयार करण्यात आलेल्या अभ्यासक्रमानुसार तिसरी भाषा म्हणून हिंदी भाषा विषय अनिवार्य असेल, असे नमूद करण्यात आले होते. परंतु राज्य सरकारच्या या निर्णयावर राज्यभरातील शैक्षणिक आणि राजकीय वर्तुळात प्रचंड टीका झाली. त्यानंतर सरकारने एक पाऊल मागे घेत हिंदी भाषा ही अनिवार्य नसेल, असे स्पष्ट केले होते.

शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनीच याबाबतची घोषणा केली होती, परंतु आता तोच निर्णय फिरवून नव्या शब्दांत जारी केल्याने शिक्षण क्षेत्रात नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. हा आदेश काढून शासनाने अप्रत्यक्षरीत्या हिंदी भाषा मुलांना शिकण्याची व शाळांना शिकवण्याची सक्ती केली आहे. राज्य अभ्यासक्रम आराखड्याचा संदर्भ दिला असला तरी हा आदेश नवीन शैक्षणिक धोरणाच्या मातृभाषेतून शिक्षण घेण्याच्या कृतीला हरताळ फासणारा आहे. राज्य सरकारच्या नव्या 'जीआर'मध्ये केवळ 'अनिवार्य'शब्द वगळला असून, २० पटसंख्या असल्यास इतर भाषा शिकता येईल असे नमूद केले आहे. मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते पाचवीसाठी हिंदी तृतीय भाषा असल्याचा उल्लेख शासन निर्णयात आहे. त्याचबरोबर ज्या विद्यार्थ्यांना हिंदी भाषेऐवजी इतर भारतीय भाषांपैकी एक भाषा ही तृतीय भाषा म्हणून शिकण्याची इच्छा असेल तर त्यांना ती भाषा निवडता येणार आहे. मात्र, शाळेत त्या तृतीय भाषेचा पर्याय घेताना किमान २० विद्यार्थी एवढी पटसंख्या असावी, असे शासन निर्णयात नमूद आहे.

सद्यस्थितीत पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या इच्छेनुसार तिसरी भाषा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. देवनागरी लिपीमुळे व संवाद साधत असताना मोठ्या प्रमाणात हिंदी भाषेचा वापर केला जातो. त्यामुळे विद्यार्थी मागणी करतील त्याप्रमाणे त्यांना तिसरी भाषा शिकवण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. पण हे करत असताना कोणत्याही वर्गातील एकूण पटसंख्येपैकी २० विद्यार्थ्यांनी एखाद्या भाषेची मागणी केली तर त्यांना त्यांच्या पसंतीची भाषा शिकवली जाईल असे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी स्पष्ट केले आहे. हिंदी लादण्याचा ठरवून कट केल्याचा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. फडणवीसांनी पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या आणि माय मराठीच्या छातीत सुरा भोसकून घात केला, तिसरी भाषा म्हणून हिंदीची सक्ती केली, जनतेची फसवणूक केली गेली. पर्यायाचा देखावा आणि हिंदी लादण्याचा हा ठरवलेला कट आहे. हा भाजपचा महाराष्ट्रद्रोही अजेंडाच असून हे मराठी भाषा, मराठी अस्मिता आणि मराठी माणूस यांना संपवण्याचे कारस्थान आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी सरकारने हिंदी शिकवून दाखवावीच असे आव्हान दिले आहे. आपण हिंदू आहोत हिंदी नाही. मराठी भाषेची सक्ती दक्षिण भारतातील राज्यात कराल का? आज भाषासक्ती करत आहात, उद्या इतर सक्ती होऊ शकते.

सहावीपासून तीन भाषा असाव्यात, पण पहिलीपासून नकोत. नवे शैक्षणिक धोरण बदलून पहिलीपासून दोनच भाषा कराव्यात. लहान मुलांना तुमच्या राजकारणात का ओढता असाही एक सूर आहे. राज्याच्या मंत्रिमंडळाला पहिलीपासून तीन भाषा मान्य आहेत का? की फक्त मुख्यमंत्र्यांचा हट्ट आहे? राज्य सरकारकडे तिसऱ्या भारतीय भाषेसाठी शिक्षक नसतील तर तिसऱ्या भाषेची सक्ती करू नये. महाराष्ट्रातील कित्येक शाळांमध्ये मराठी भाषा शिकवली जात नाही त्याचे काय? तिसऱ्या भाषेच्या शिक्षणावर सरकार ठाम आहे पण शिक्षण विभागाकडे हिंदीसह कोणत्याही 'तिसऱ्या' भाषेची पाठ्यपुस्तके उपलब्ध नाहीत. मराठी आणि इंग्रजीसह सात माध्यमांची पाठ्यपुस्तकांची छपाई केलेली नाही. माध्यमनिहाय अन्य भारतीय भाषांतील पुस्तके उपलब्ध असली तरी ती तृतीय भाषा म्हणून देण्याचे निर्देश नाहीत म्हणे. एकूण सगळाच सावळा गोंधळ दिसतो. जर देशात राज्येच भाषावार प्रांतरचनेनुसार तयार केलेली असतील तर हिंदी भाषेची सक्ती कशासाठी?

# २०२६ पासून सर्व दुचाकींना एबीएस आणि दोन हेल्मेट बंधनकारक; केंद्रीय परिवहन मंत्रालयाचा मोठा निर्णय

नवी दिल्ली । वृत्तसेवा

रस्ते अपघातांमध्ये होत असलेल्या वाढीवर नियंत्रण मिळवण्यासाठी केंद्रीय परिवहन आणि महामार्ग मंत्रालयाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. १ जानेवारी २०२६ पासून बाजारात येणाऱ्या सर्व नवीन दुचाकींसाठी (स्कूटर आणि मोटारसायकल) एबीएस प्रणाली बंधनकारक करण्यात आली आहे. यासोबतच प्रत्येक नवीन दुचाकीसोबत दोन हेल्मेट देणेही अनिवार्य असेल.



सध्या फक्त १२५ सीसी किंवा त्यापेक्षा जास्त क्षमतेच्या इंजिन असलेल्या दुचाकींनाच एबीएस प्रणाली बंधनकारक आहे. त्यामुळे सुमारे ४० टक्के दुचाकींमध्ये ही अत्यावश्यक सुरक्षा प्रणाली उपलब्ध नाही. पण आता, सर्व इंजिन क्षमतेच्या दुचाकींना ही सुविधा असणे आवश्यक ठरणार आहे. केंद्रीय मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, एबीएस प्रणालीमुळे आपत्कालीन ब्रेकिंगच्या वेळी चाकं लॉक होण्याची शक्यता कमी होते, ज्यामुळे वाहनाची स्थिरता राखली जाते आणि अपघाताचा धोका टळतो. त्यामुळे दुचाकीस्वारांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा आहे. मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, या निर्णयामुळे अपघातांमधील मृत्यूदरात लक्षणीय घट होण्याची अपेक्षा आहे. यासोबतच हेल्मेटच्या वापरालाही चालना मिळेल. दोन्ही हेल्मेट गुणवत्तापूर्ण असणे आवश्यक असून त्यांची प्रमाणपत्र असलेली असणे बंधनकारक असेल. हा निर्णय लागू करण्यासाठी वाहन उत्पादक कंपन्यांना पुरेसा वेळ देण्यात आला असून २०२६ पूर्वी सर्व आवश्यक बदल करण्यात यावेत, असे निर्देशही देण्यात आले आहेत. हा निर्णय देशात सुरक्षित वाहतुकीच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

## 'एचएसआरपी' नंबरप्लेटसाठी १५ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

आता उच्च सुरक्षा क्रमांक नोंदणी पाटी लावण्यासाठी वाहनधारकांना १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी शुक्रवार दि.२० जून रोजी दिली. राज्यात २०१९ पूर्वीच्या जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी पाटी (एचएसआरपी) बसवणे बंधनकारक केले आहे. यासाठी राज्यातील वाहनधारकांची गडबड सुरू आहे. पण, पाट्यांचा पुरवठा कमी असल्यामुळे नोंदणीमध्ये अडचणी येत आहेत. यामुळे आता तिसऱ्यांदा मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्यात आतापर्यंत ३० टक्के वाहनधारकांनीच नोंदणी पाटी बसवून घेतली आहे.

## वीरसागर महाराज यांच्या हस्ते संयम कीर्ती स्तंभाचा लोकार्पण सोहळा

जालना ( प्रतिनिधी)

आचार्य विद्यासागर महाराज यांचे शिष्य निर्यापक श्रमण विरसागर महाराज यांचा सानिध्यात २६/२७/२८ जुन रोजी १००८ भगवान महावीर दि.जैन मंदिर अंबड येथे नुतन निर्मित वेदीची वेदी प्रतिष्ठा आयोजित करण्यात आली असून ३०जुन रोजी १००८ भगवान महावीर चौकाचा (संयम कीर्ती स्तंभाचा) लोकार्पण सोहळा संपन्न होणार आहे या कार्यक्रमाची पत्रिका सुपूर्द करत आमंत्रण पत्रिका मान्यवरांना देण्याआले. आमंत्रण पत्रिका देण्याचा कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालयात आमदार नारायण कुचे, जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ उपजिल्हाधिकारी रिता मैत्रेवार अप्पर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी, जीएसटी ऑफिसर चेतन जैन अन्य मान्यवराचा उपस्थित संपन्न झाला.या वेळेस समाजातील अनिल छाबडा सुरेन्द्र बुरले,रविंद्र मसलकर,अरूण करतगवंडे,अतिश बीडकर अलकेश आव्हाने प्रेमचंद खले सचिन शेलार सचिन खले संजय उपाध्ये सतिश भेडुळकर अतुल तुनतुने आदींची उपस्थिती होती.



## टी.सी.हरवला आहे

शुभम विलास कोमटवार या नावाचा इयत्ता १२वी पास चा बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय जालना चा टीसी आणि सोबत इतर महत्त्वाची कागदपत्रे हरवली आहे. जालना मध्ये नूतन वसाहत ते मस्तगड प्रवासादरम्यान हरवली आहे तरी कोणास मिळाली किंवा आढळल्यास खालील क्रमांक वर संपर्क करावा.

–::संपर्क::–

**शुभम विलास कोमटवार**

**रेल्वे स्टेशन,जालना मो. नं ९१५८४८०२००**

## पान ६ वरून...

### सरपंच मयूर आंधळे यांचा

स्वागत केले. तर शाळेत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना शालेय विभागाकडून आलेले नवीन पुस्तकाचे वाटप केले. तर प्रत्येक विद्यार्थी विद्यार्थिनींना पहिल्याच दिवसापासून नवीन गणवेशाचे वाटप केले जात आहे. त्याच बरोबर नवीन सूज, सॉक्स जोडी, पेन व इतर दर्जेदार व उत्कृष्ट अशा शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले आहे. तर रुई हे गांव विकासात्मक बाबीत आदर्श ठरले आहे. गावचे कर्तव्यदक्ष उच्चभूषित युवा सरपंच मयूरशेठ आंधळे देखील गावच्या उन्नत भल्यासाठी तत्पर असल्याचे वारंवार दिसून येत आहेत. म्हणूनच असे उपक्रम ठेवून शासनाच्या जिल्हा परिषदेच्या शाळेला व शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी असा सरपंच एक संजीवनी ठरत असल्याचे दिसून येत आहे. तर मयूर आंधळे यांनी असा आगळा-वेगळा शालेय साहित्य उपक्रम ठेवल्याने या कार्यक्रमाची चर्चा तालुका भरात होत नाही. तर या कार्यक्रमाचे समाधान ग्रामस्थांमधून व्यक्त केले जात आहे तर जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांच्या तोंडावर हसू व आनंद दिसून आला. या कार्यक्रमाला उपसरपंच सुधाकर लोंढे, बाबासाहेब आंधळे, कृष्णा नाना खाडे, अशोक विष्णू लोंढे, अशोक महादेव लोंढे, तुकाराम गवळी यांच्यासह मुख्याध्यापक सौ.ताराळकर मॅडम, शिक्षक देशपांडे सर, विद्यार्थी ग्रामस्थ व सर्व ग्रामपंचायत सदस्य कर्मचारी उपस्थित होते.

शाळेसाठी आम्ही आहोत -मयूरशेठ आंधळे

गांवच्या प्रत्येक कामाच्या विकासात्मक बाबतीत जसे आम्ही कार्यतत्पर आहोत तेवढेच म्हणा किंवा त्यापेक्षा अधिक म्हणा, आम्ही शाळेसाठी सुद्धा कटिबद्ध होतो, आणि पुढेही राहू. शाळा ज्ञानमंदिर आहे या ज्ञान मंदिरातूनच आजचे विद्यार्थी भविष्यातील अधिकारी म्हणून बाहेर पडतील. याचाच विचार घेऊन गावच्या शाळेत शिक्षण देणाऱ्या शिक्षक कर्मचाऱ्यांचे देखील तेवढ्याच पद्धतीने आम्ही स्वागत व सुविधा देण्यात कोठेही कमी करणार नाहीत. याची दक्षता मी सरपंच भावनेने नाही. तर गावातील प्रत्येक व्यक्ती हा गावच्या शाळेसाठीच आहे, असे उद्गार काढत असे शालेय साहित्याचे कार्यक्रम घेऊन मनाला देखील समाधान लाभते असे मत देखील यावेळी रूई गांवचे उच्चभूषित युवा सरपंच मयूर शेठ आंधळे यांनी मत व्यक्त केले आहे.

### समीर मुजावर यांचे

असंख्य पोलीस कर्मचारी नाराज होते. या नाराजी नाट्या मधून काही कर्मचाऱ्यांनी मॅट कोर्टात धाव घेतली आहे. अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनलाही २६ पोलीस कर्मचारी बदली होऊन आलेले असून या पैकी बार्शी येथील रहिवासी असलेले समीर मुजावर (वय ४२) हे ही एक होते. मुजावर हे बार्शीचे राहिवासी असल्याने त्यांचा स्व जिल्ह्यात म्हणजे सोलापूर जिल्ह्यात बदली साठी प्रयत्न सुरु होता. मागील २ दिवस ते पोलीस स्टेशनच्या कामासाठीच मंबईला गेले होते आणि रात्रीच परत अंबाजोगाईला आले होते. आज आपल्या अन्य सहकाऱ्या सोबत चनई रोडवरील किरायाने घेतलेल्या रूममध्ये मुजावर असतानाच त्यांना हृदयविकाराच्या तीव्र झटका आला आणि त्यातच त्यांचे दुःखद निधन झाले. स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात सध्या त्यांच्या शवविच्छेदची प्रक्रिया सुरु असून त्यांच्या पश्चात पत्नी २ मूले व अन्य परिवार आहे. मुजावर यांच्या दुःखद निधना मूळे पोलीस वर्तुळात हळहळ व्यक्त होत आहे.

### वारकरी दिंड्यांचे पोलीस

तसेच रतिलाल दुगड,अशोक तिवारी,किशोर बाहेती, राजू राठी, गोविंद मुंदडा, गोटू घोलप यांची उपस्थिती होती. या वेळी पोलीस अधीक्षक यांच्या हस्ते पहिल्या ३ दिंडीचे प्रमुख ह.भ.प.सुधाकर महाराज मेहुणकर (मुक्ताबाई देवस्थान मेहुण) ह.भ.प.कृष्णा महाराज गिरी (चैतन्य कानिफनाथ महाराज पायी दिंडी सोहळा) ह.भ.प.रमेश महाराज (वै.सद्गुरू मुकुंद महाराज इंगावनकर) यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी संतोष सोहनी यांनी सर्वांचे आभार मानले.

### शिवसेनेचे सईद खान

करण्यात आली त्याचबरोबर माजलगाव उपजिल्हा रुग्णालयांमध्ये रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले त्याचबरोबर शहरात वृक्षारोपणही करण्यात आले अशा विविध सामाजिक उपक्रमाने वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके युवा सेना तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे माजी नगरसेवक विजय शिंदे राहुल बावणे रामेश्वर काशीद किशोर झुंजुर्के शेख महबूब शेख बाबा सय्यद कादरी सिराज भाई आदी कार्यकर्ते उपस्थित होते

## पान १ वरून...

### बंदोबस्ताच्या नियोजनात

उपाधिक्षक यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील कर्मचाऱ्यांचा वापर बंदोबस्तासाठी करायचा आहे. जर बंदोबस्तासाठी मनुष्यबळ कमी पडत असेल तर त्यांनी अप्पर पोलिस अधिक्षकांकडे तशी मागणी करायची आहे. त्यानंतरही बंदोबस्ताचे योग्य नियोजन होत नसेल तर अप्पर पोलिस अधिक्षक यांनी पोलिस अधिक्षक यांना तसेच कळवल्यावर मुख्यालयातून आवश्यक तो पोलिस बंदोबस्त पोलिस अधिक्षक देणार असल्याचे पोलिस अधिक्षक नवणीत काँवत यांनी सांगितले. काँवत यांच्या या बंदोबस्तासंदर्भातील तगडा नियोजनामुळे पोलिस कर्मचाऱ्यांवरील ताण कमी होणार आहे.

### आता सातबारा, इतर जमीन

ती सुलभपणे वापरता येणार आहे.

पूर्वी सातबारा उतारा मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना स्थानिक सेतू केंद्रावर जावे लागत असे. जरी यासाठी शासनाने केवळ १५ रुपये शुल्क निश्चित केलेले असले, तरी प्रत्यक्षात अनेक केंद्रांवर यासाठी जादा पैसे घेतले जातात. त्यातही हा उतारा केंद्राच्या संगणकावर डाऊनलोड होत असल्याने शेतकऱ्याला तो पेनड्राईव्हमध्ये कॉपी करून न्याया लागतो. यामुळे तांत्रिक अडचणी, माहितीचा गैरवापर आणि वेळेचा अपव्यय मोठ्या प्रमाणात होतो. आता मात्र ही अडचण दूर झाली आहे. शेतकऱ्याला केवळ मोबाईल क्रमांक नोंदवून संबंधित कागदपत्र थेट व्हॉट्सअॅपवर मिळू शकणार आहे. या नव्या सुविधेसाठी राज्यातील नागरिकांना 'महाभूमी' या अधिकृत संकेतस्थळावर जावे लागेल. तेथे स्वतःचा मोबाईल क्रमांक आणि जमीन मालकीचे तपशील भरून नोंदणी करावी लागेल. ही नोंदणी फक्त ५० रुपयांच्या शुल्कात पूर्ण करता येईल. नोंदणी पूर्ण झाल्यानंतर नागरिकाला व्हॉट्सअॅपवरून कागदपत्र मागवता येणार आहेत. विशेष म्हणजे ही सेवा तीन वेगवेगळ्या पातळ्यांवर काम करणार आहे.

### माजी मंत्री धनंजय मुंडेंना

मंजुषा देशपांडे यांच्या एकलपीठापुढे सुनावणी पार पडली आणि न्यायमूर्ती यांनी धनंजय मुंडे यांनाच दणका दिला. या निर्णयानंतर करुणा मुंडे यांनी माध्यमांशी बोलताना धनंजय मुंडेंवर गंभीर आरोप केले आहेत. मुंडे हे मूळात चांगले आहेत, पण त्यांच्यामागे असलेल्या 'दलाल गँग'मुळेच त्यांची चुकीची पावले पडत आहेत, असा दावा करुणा मुंडे यांनी केला.

### नवगण, विनायक शिक्षण

स्थापना करून शिक्षणाचा दिवा ग्रामीण भागात तेवत ठेवला. त्यांच्या प्रयत्नांमुळे संस्थेने लावलेले शैक्षणिक रोपटे आज वटवृक्ष बनले आहे. पहिल्यांदा संस्थेच्या सचिवपदी ३१ डिसेंबर १९६५ रोजी भागुजीराव सनगर, १९६८ मध्ये केशरकाकू क्षीरसागर, १९७७ मध्ये सोनाजीराव क्षीरसागर, १९८७ मध्ये भारतभूषण क्षीरसागर यांची नियुक्ती झाली. त्यानंतर आता सन २०२५ मध्ये सचिवपदी डॉ.योगेश क्षीरसागर यांची निवड झाली.

सध्या नवगण शिक्षण संस्थेअंतर्गत बीड जिल्ह्यातील विविध भागात ५ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये, शारीरिक शिक्षण महाविद्यालय, औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय, सैनिक विद्यालय, आश्रमशाळा, उर्दू शाळा प्रत्येकी १, ६ उच्च माध्यमिक शाळा, १० माध्यमिक शाळा, प्राथमिक शाळा, व्यवसाय अभ्यासक्रम केंद्रे प्रत्येकी २ अशा विविध प्रकारच्या संस्था कार्यरत आहेत. यामध्ये एकूण सुमारे ६०० शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यरत असून दरवर्षी सुमारे २५ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तसेच, याशिवाय १९८४ साली स्थापन झालेल्या विनायक युवक कल्याण संस्थेमार्फत ३ माध्यमिक शाळा, २ प्राथमिक शाळा चालविल्या जातात. येथे सुमारे ५० कर्मचारी कार्यरत असून दरवर्षी अंदाजे १००० विद्यार्थी शिक्षण घेतात. याआधी संस्थेचे सचिवपद डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांनी समर्थपणे सांभाळले. दरम्यान, आता डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या रूपाने मिळालेले नव्या दमाचे नेतृत्व, आधुनिक शिक्षणदृष्टी यामुळे संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीत अधिक सकारात्मक परिवर्तन होईल, अशी अपेक्षा व्यक्ती केली जात आहे. त्यांच्या निवडीबद्दल संस्थेचे सर्व संचालक मंडळ, प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

नवगण, विनायक शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शहर, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी मिळावी, हा संस्थेचा मूलमंत्र राहिला आहे. या परंपरेत सातत्य राखून संस्थेचा विस्तार व शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत करण्यासाठी कटिबद्ध राहू. अधिकाधिक शैक्षणिक उत्कृष्टता, नाविन्यपूर्ण व्यावसायिक अभ्यासक्रम आणण्यासाठी प्रयत्न करू. तसेच, संस्थेच्या माध्यमातून सातत्याने सामाजिक उपक्रम राबविले जातील.

-डॉ.योगेश क्षीरसागर, नवनिर्वाचित सचिव, नवगण व आदर्श शिक्षण संस्था, बीड.

### 33 के.व्ही च्या नवीन

सुरुवात करण्यात आली आहे.

बीड शहर आणि ग्रामीण भागात वीजपुरवठा करण्यासाठी सद्यस्थितीला १३२ के.व्ही. ची लाईन कार्यरत आहे. याच लाईनवरून बीड शहर आणि ग्रामीण भागातील पेंडगाव, नामलगाव आणि ईट पाणीपुरवठा सबस्टेशनला वीजपुरवठा केला जात होता. परंतु हा होत असलेल्या वीजपुरवठ्याचा भार १३२ के.व्ही. केंद्रासाठी अत्याधिक आहे. त्यामुळे अतिभाराने सातत्याने वीजेचा लपंडाव सुरू होता. सततच्या वीजपुरवठा खंडणामुळे नागरिक त्रस्त झाले असल्याने यावर आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम यांच्या प्रयत्नातून मार्ग काढण्यात आला आहे. यातून मार्ग काढण्यासाठी बीड शहर आणि ग्रामीण भागातील वीजपुरवठ्याचा भार २२० के.व्ही. आणि १३२ के.व्ही. लाईनवर विभागला जाणार आहे. ग्रामीण भागातील पेंडगाव, नामलगाव, कुक्कडगाव आणि ईट पाणीपुरवठा सबस्टेशन १३२ के.व्ही. वरून २२० के.व्ही. लाईनवर शिफ्ट केली जाणार आहेत. दरम्यान या वीजभाराच्या नियोजित विभागणीसाठी पेंडगाव, नामलगाव, कुक्डगाव, ईट पाणीपुरवठा सबस्टेशनस २२० के.व्ही. केंद्राला जोडणीसाठी एक ३३ के.व्ही. लाईन आवश्यक होती. त्यामुळे आ.संदीप क्षीरसागरांच्या प्रयत्नातून ३३ के.व्ही. ची नवीन लाईन मंजूर करण्यात आली. या ३३ के.व्ही. लाईनचे आ.संदीप क्षीरसागरांनी यांनी उद्घाटन केले असून या कामास प्रत्यक्ष सुरूवात करण्यात आली. या नवीन ३३ के.व्ही. च्या लाईनचे अंतर हे १२ किलोमीटर असून त्यामध्ये १५० पोल असणार आहेत. दरम्यान या कामाच्या शुभारंभ प्रसंगी माजी आ.सय्यद सलीम यांच्यासह महावितरण विभागाचे अधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.

**शहर आणि ग्रामीणच्या सबस्टेशनसची होणार शिफ्टींग**

सध्या बीड शहरातील आणि ग्रामीण भागातील काही सबस्टेशन १३२ के.व्ही. च्या लाइनला जोडलेले आहेत. परंतु हा सदरचा भार १३२ के.व्ही. केंद्राच्या क्षमतेपेक्षा अधिकचा होत असल्याने वीजपुरवठा व्यवस्थित आणि नियमित होत नव्हता. यावर मार्ग म्हणून १३२ के.व्ही. च्या केंद्रावर असणारी नामलगाव, पेंडगाव, कुक्कडगाव आणि ईट येथील पाणीपुरवठा ही सबस्टेशनस १३२ के.व्ही. वरून २२० के.व्ही. केंद्रावर शिफ्ट केली जाणार आहेत. त्यामुळे शहरातील माळीवेस, एमआयडीसी, जालना रोड, पांगरी रोड ही सबस्टेशन १३२ के.व्ही. आणि ग्रामीण भागातील नामलगाव, पेंडगाव, कुक्कडगाव आणि ईट येथील पाणीपुरवठा ही सबस्टेशनस २२० के.व्ही. वर असे स्वतंत्रपणे जोडले जाणार आहेत.

### बँक खातेदारांनो लक्ष द्या

१५ हजार रुपयांपेक्षा जास्त खर्च केला तर अतिरिक्त एक टक्के शुल्क भरावे लागेल. याशिवाय, जर तुम्ही वीज, पाणी आणि गॅसवर पन्नास हजार रुपयांपेक्षा जास्त पैसे दिले तर त्यावरही एक टक्के शुल्क भरावे लागेल.

याशिवाय, आता द्वारे पैसे पाठवण्यासाठी म्हणजेच त्वरित सेवेसाठी तुम्हाला तुमच्या व्यवहारानुसार शुल्क भरावे लागेल. जसे की १ हजार रुपयांसाठी प्रति व्यवहार २.५ रुपये, तर १ हजार ते १ लाख रुपयांसाठी प्रति व्यवहार ५ रुपये. तर १ लाख ते ५ लाख रुपयांसाठी प्रति व्यवहार १५ रुपये द्यावे लागतील.

**बँकेच्या नियमांमध्ये बदल**

खासगी क्षेत्रातील आणखी एका मोठ्या बँकेने बँकेने आणि वर आकारण्यात येणाऱ्या काही शुल्कात बदल केले आहेत. यानंतर, जर तुम्ही आता इतर कोणत्याही बँकेचा वापर केला तर तुम्हाला त्यावर काही अतिरिक्त शुल्क भरावे लागेल. म्हणजेच, मेट्रो शहरांमध्ये, तुम्हाला दरमहा तीन मोफत व्यवहार मिळतील. तर लहान शहरांमध्ये, तुम्हाला पाच पर्यंत मोफत व्यवहार दिले जातील. यानंतर, जिथे पूर्वी पैसे काढण्यासाठी २१ रुपये आकारले जात होते, तिथे आता तुम्हाला २३ रुपये शुल्क द्यावे लागेल. जर तुम्ही फक्त शिल्लक तपासली किंवा आर्थिक नसलेले काम केले तर त्यावर प्रति व्यवहार ८.५ रुपये शुल्क आकारले जाईल.

### घर म्हणजे केवळ

कार्यकारी मंडळी न्यायप्रक्रियेविना एखाद्याचे घर पाडू शकत नाहीत.

गवई यांनी स्पष्ट सांगितले की, कार्यकारी यंत्रणा न्यायाधीश, न्यायनिर्णायक आणि शिक्षा देणारी अशी तिहेरी भूमिका पार पाडू शकत नाही. त्यांनी यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या २०२३ मधील निर्णयाचा उल्लेख केला, ज्यामध्ये कायदेशीर प्रक्रिया न पाळता आरोपींची घरे पाडण्याच्या कारवाईला आळा घालण्यात आला होता. गवई म्हणाले, ''घर बांधणे म्हणजे केवळ मालमत्ता नव्हे, तर सर्वसामान्य नागरिकाच्या कष्टांचे, स्वप्नांचे आणि भविष्याच्या सुरक्षिततेचे प्रतीक असते.'' त्यांनी सांगितले की, निवाऱ्याचा अधिकार हा अनुच्छेद २१ अंतर्गत मूलभूत अधिकाराचा भाग आहे. सरन्यायाधीश गवई यांनी सांगितले की, ७५ वर्षांत भारतीय संविधानाने गरिब, वंचित आणि मागास समाजघटकांसाठी सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय घडवून आणण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे. त्यांनी नमूद केले की, जरी संसद आणि सरकारने अनेक कायदे व धोरणे राबवली, तरी सर्वोच्च न्यायालयाने सामाजिक-आर्थिक हक्कांना मूर्त स्वरूप देत त्यांना अंमलबजावणीय मूलभूत अधिकारांमध्ये रूपांतरित केले. सरन्यायाधीश बी. आर. गवई, हे भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे दुसरे दलित सरन्यायाधीश असून, त्यांनी अभिमानाने सांगितले की, ''मी संविधानाच्या मूल्यांचा परिणाम आहे. अनुसूचित जाती, जमाती आणि मागासवर्गीयांसाठी केलेल्या सकारात्मक कृती धोरणांमुळे मी आज इथे आहे.''

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शनिवार, दि. २१ जुन २०२५



## बीड व अंबेजोगाई येथील सैनिकी मुलांचे वसतीगृहामध्ये दिनांक १ जुलै २०२५ पासुन प्रवेश प्रक्रिया सुरू

बीड: जिल्हयातील समस्त आजी-माजी सैनिक, युध्द विधवा यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता सैनिकी मुलांचे वसतीगृह बीड व अंबेजोगाई हे दिनांक ०१ जुलै २०२५ पासुन पुर्ण क्षमतेने सुरु होत आहे. सदरचे वसतीगृहामध्ये ज्या आजी-माजी सैनिक, युध्दविधवा, विधवांचे पाल्य बीड व अंबेजोगाई येथे शिकत आहेत त्यांना प्रवेश दिला जातो. सदर पाल्यांना अति अल्प दराने पदानुसार शुल्क आकारले जाते तसेच विधवांच्या मुलांना वसतीगृहामध्ये विनामुल्य प्रवेश दिला जातो. प्रवेशाकरीता प्रवेश पुस्तीका वसतीगृह अधिक्षक यांचे कडे उपलब्ध आहेत. तरी इच्छुक आजी-माजी सैनिक, युध्द विधवा, विधवा, इतर नागरीक पाल्यांनी वसतीगृहामधुन प्रवेया पुस्तीका खरेदी करुन आपले प्रवेश दिनांक ३० जुन २०२५ पर्यंत निश्चित करावे, असे आवाहन स्कॉड्रन लिडर विद्यासागर कोरडे (नि.) जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, बीड यांनी केले आहे.

# शैक्षणिक वातावरणामुळे विद्यार्थ्यांची एक आदर्श पिढी निर्माण होते-राजकिशोर मोदी

## बालाजी शिक्षण मंडळाच्या वतीने गुणवंतांचा सन्मान व कौतुक सोहळा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने मोदी लर्निंग सेंटरमध्ये आज नीट, सीईटी,तसेच दहावी व बारावी मध्ये घवघवीत यश मिळवलेल्या अंबाजोगाई शहर व परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान व कौतुक सोहळा नुकताच संपन्न झाला. यावेळी संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी यांनी अंबाजोगाई शहरातील शिक्षण हे अत्यंत गुणवत्ता पूर्ण असल्याने येथून विद्यार्थ्यांची एक आदर्श अशी पिढी निर्माण होत असल्याची भावना व्यक्त केली. प्राचार्य बी आय खडकभावी, संस्थेचे कार्यकारी संचालक संकेत मोदी, प्राचार्य एम प्रशांतकुमार,ॲड संतोष पवार, प्रा सविता बुरांडे तसेच डिंपल मोदी यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये गुणवंतांचा हा सन्मान व कौतुक सोहळा संपन्न झाला. या सोहळ्याची सुरुवात सरस्वती पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे प्राचार्य एम प्रशांतकुमार यांनी केले. यावेळी त्यांनी सांगितले की श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ हे येथील विद्यार्थ्यांना नेहमीच उच्च तथा गुणवत्ता पूर्वक शिक्षण देत आले आहे. त्यामुळे येथील विद्यार्थी हा परिपूर्ण होऊनच समाजात बाहेर पडतो असे सांगितले. यावेळी प्राचार्य बी आय खडकभावी तसेच ॲड संतोष पवार यांनी देखील उपस्थिती गुणवंत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.



गुणवंतांचा सन्मान व कौतुक करतांना राजकिशोर मोदी म्हणाले की अंबाजोगाई हे शैक्षणिक परंपरेने समृद्ध असलेले शहर असून, येथून नेहमीच मेहनती, हुशार आणि प्रेरणादायी विद्यार्थी घडले आहेत. विद्यार्थ्यांच्या यशामध्ये त्यांच्या शिक्षकांचे मार्गदर्शन तसेच पालकांचा पाठिंबा आणि विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण मेहनत दिसून ही आढळून येते.श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ हे केवळ आपल्याच संस्थेपुरते मर्यादित न राहता शहरातील इतर संस्थांमधील विद्यार्थ्यांचाही गौरव वेळोवेळी करत असते आणि यामुळेच खऱ्या अर्थाने शैक्षणिक तथा सामाजिक बांधिलकी जोपासली जात असून बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या अंतर्गत न्यू व्हिजन पब्लिक स्कूलच्या माध्यमातून अंबाजोगाई परिसरातील सर्व होतकरू विद्यार्थ्यांना बोर्डाचे दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून दिले जात आहे . यामुळे अनेक विद्यार्थी आज वैद्यकीय , इंजिनिअरिंग तसेच व्यावसायिक क्षेत्रात कार्यरत असल्याचे राजकिशोर मोदी यांनी नमूद केले. अंबाजोगाई शहर तथा परिसरातील गुणवंत अशा विद्यार्थ्यांचा सन्मान करून त्यांच्या यशाचा गौरव करताना आम्हांला अतिशय आनंद होत असल्याची स्पष्टोक्ती देखील मोदी यांनी याप्रसंगी दिली. त्याचबरोबर अंबाजोगाई परिसरातील होतकरू मुलांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्याची संधी मिळाल्याने आपणास मनस्वी आनंद होत असल्याचे देखील यावेळी राजकिशोर मोदी यांनी नमूद केले. यावेळी या ठिकाणी उपस्थित असलेल्या पालकांपैकी उम्मीद फाउंडेशनचे प्रमुख डॉक्टर लतीफ पठाण तसेच प्राचार्य गणेश तरके यांनी आपले मनोगत व्यक्त करताना बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून शहराची शैक्षणिक गुणवत्ता वाढण्याचे कार्य अतिशय उत्तम रित्या होत असल्याचे आवर्जून सांगितले. या सन्मान तथा कौतुक सोहळ्यात सन २०१२ पासून शंभर टक्के निकाल देण्याची न्यू व्हिजन पब्लिक स्कूलची परंपरा याही वर्षी कायम ठेवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये इयत्ता १२ वी मध्ये प्रथम येणारी विद्यार्थिनी पुनम दत्तात्रय चव्हाण (८९.४०) द्वितीय तेजस्वीनी चंद्रकांत पांचाळ ( ८८.२० ) इयत्ता १० वी मध्ये शाळेतून प्रथम आलेला विद्यार्थी अभिनव अविनाश मुंडे ( ९८.२०), द्वितीय सार्थक रत्नेश लोहिया (९८.००),हर्षल गजभार (९७.२०) यांच्या गुणवत्ता प्राप्त सर्व विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. संस्थेतर्फे विशेष सन्मानामध्ये अंबाजोगाई शहरासह तालुक्यातील २०२५ मध्ये गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये अंबाजोगाई येथील कन्हैया खंदाडे (६३२) ऑल इंडिया रँक २१५,न्यू व्हिजन पब्लिक स्कूलचा माजी विद्यार्थी विराज गणेश तरके ( ५८७ ) ओबीसी ऑल इंडिया रँक ९१५,पौर्णिमा प्रविण देशमुख ( ५१७ ), सार्थ विनय परदेशी (५००) येल्डा या ग्रामीण भागातील ६० टक्के अंध असलेली विद्यार्थिनी कु.भाग्यश्री सातपुते (५०२ ), अंबाजोगाई येथील सद्दाम अलीम शेख ( ५०० ),श्रध्दा सचिन दरगड (४४८) यासोबतच वेदांत सुजित दिक्षित (९९.८८% ) या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.विद्यार्थ्यां सोबतच या गुणवंतांच्या यशामध्ये त्याच्या शाळेतील शिक्षकांचाही सत्कार तथा सन्मान करण्यात आला.

## जिल्हाधिकाऱ्यांच्या आगमना निमित्त पाटोद्यात 'सजावट'; पण वास्तव वेगळंच



पाटोदा। प्रतिनिधी

बीड जिल्हाधिकारी साहेबांचा तहसील कार्यालय पाटोदा येथे नुकताच दौरा झाला. त्यांच्या आगमना निमित्त तहसील कार्यालयात अचानकच साफसफाई, रंगरंगोटी आणि सजावटीचा धडका दिला गेला. एरवी गोंधळ, अस्वच्छता आणि कर्मचाऱ्यांच्या गैरहजेरीने त्रस्त असलेले हेच कार्यालय एका दिवसात 'चकाचक' करण्यात आलं. सामान्य नागरिकांच्या मते, हे केवळ एक 'दिसावं तसं' रूप होतं कारण प्रत्यक्षात कार्यालयीन कारभार व कर्मचारी उपस्थिती विषयी तक्रारी सातत्याने येत असतात. पण जिल्हाधिकाऱ्यांच्या भेटीच्या वेळी सर्व काही सुरळीत असल्याचं चित्र उभं करण्यात आलं. यावेळी जिल्हा परिषद जरेवाडी शाळेला भेट देण्यात आली, जी पूर्वनियोजित असल्याचं स्पष्ट होते कारण तर याच पाटोदा तहसील कार्यालयाच्या शेजारी असलेली जिल्हा परिषद शाळा गेल्या काही वर्षांपासून बंद आहे हे प्रशासनातील कोणाच्याच लक्षात आलं नाही. तसंच पाटोद्यातील जिल्हा परिषद कन्या शाळेत शिक्षकांची कमतरता असूनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे यावर

शिक्षण विभाग प्रशासनाच्या गंभीर समस्यांकडे दुर्लक्ष का करते असे प्रश्न पत्रकारांनी विचारताच यावर जिल्हाधिकाऱ्यांनी मला जास्त माहिती नाही म्हणून उत्तर देणं टाळले तसेच काही नागरिक जिल्हाधिकाऱ्याकडे आपली तक्रार घेऊन आले मात्र त्यांना योग्य उत्तर नाही मिळाल्याने असमाधानी होऊन वापस गेले. यावर एक नागरिकांनी प्रतिक्रिया दिली ''प्रशासनासमोर खोटं चित्र सादर केलं जातं आणि खरी अडचण मुळातूनच लपवली जाते,'' या प्रकारामुळे 'कागदोपत्री विकास' आणि 'खऱ्या अडचणींची' दरी पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

## बीड शहर बचाव मंच कडून महेदवीया दायरा कब्रस्तानची पाहणी

**बीड । प्रतिनिधी**

**शहरातील मोमीनपुरा भागात असलेल्या महेदवीया दायरा कब्रस्तानची पाहणी बीड शहर बचाव मंच ने शुक्रवार दिनांक २० जून रोजी केली. कब्रस्तानची झालेली दुर्दशा पाहून मंच चे पदाधिकारी आणि सदस्यांनी संवेदनशीलतला व्यक्त करत कब्रस्तानच्या संरक्षक भिंती बांधण्यासाठी तसेच कब्रस्तान मध्ये आवश्यक असलेल्या इतर सोयी सुविधा कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्न करून लवकरात लवकर पूर्णत्वास नेऊ असे म्हटले आहे.**



यावेळी बीड शहर बचाव मंच च्या वतीने नितीन जायभाये, डी.जी. तांदळे सर व नितीन वाघमारे यांनी भूमिका स्पष्ट केली. गेल्या दहा वर्षांपासून बऱ्याच वेळेस लोकप्रतिनिधींना पाठपुरावा करूनही लोकप्रतिनिधीं दिलेले आश्वासन पाळत नाहीत, समाजाच्या अडचणी समजून घेण्याची कसलीही त्यांची मानसिकता दिसत नाही. कशाही - कसल्याही प्रकारे प्रतिसाद देत नाहीत, निवडणुकांनंतर तोंड ही दाखवत नाहीत. काम करणं दुरच राहीलं, साधा फोन ही उचलत नाहीत. अशी यावेळी उपस्थितांच्या वतीने प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली. कब्रस्तानची पाहणी केल्यानंतर व ऐतिहासिकता जाणून घेतल्यानंतर नितीन जायभाये यांनी या कब्रस्तानच्या संरक्षक भिंतीचे पुनर्निर्माण करण्यात येईल,असे ठामपणे आश्वासन दिले आहे. बीड नगर पालिकेची नवीन असेंबली किंवा सभागृह अस्तित्वात येताच तात्काळ ही कामे करून दिल्या जातील. तसेच महेदवीया कब्रस्तानच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या सर्व सोयी सुविधा निर्माण करून दिल्या जातील. असेही वचन दिले आहे. यावेळी महेदवीया समाजाचे प्रतिनिधी तथा मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी महेदवीया दायरा कब्रस्तान विषयी पुर्ण माहिती दिली. यावेळी बीड शहर बचाव मंचचे नितीन जायभाये, ज्येष्ठ मार्गदर्शक सेवानिवृत्त प्राचार्य डी.जी. तांदळेसर, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे, रमेशराव गंगाधरे,ॲड. नितीन वाघमारे, रामधन जमाले, सुधीरभाऊ देशमुख,पेठ बीड विभागातील भुषणजी पवार, आपतक यूट्यूब चॅनल चे संपादक इमरोज भाई, शेख फारुख, शेख वसीफ, शेख नसीर, शेख हनीफ, शेख लईख आदींची उपस्थिती होती.

## आरोग्य विभागातील मुख्यालयात न राहणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांच्यावर कारवाई करा-सचिन मेघडंबर

पाटोदा । प्रतिनिधी

तालुका आरोग्य अधिकारी सह प्राथमिक आरोग्य केंद्र मधील कर्मचारी व डॉक्टर हे मुख्यालय राहत नसल्यामुळे रुग्णाची मोठी हेळसाड होत आहे. बरेच कर्मचारी जिल्ह्याच्या ठिकाणी किंवा तालुक्याच्या ठिकाणी राहतात किंवा पर जिल्ह्यात राहतात त्यांना अपडाऊन करण्यासाठी भरपूर वेळ लागतो कधी कधी तिथे येतही नाहीत त्यामुळे रुग्णसेवा पूर्ण कोलमडली आहे सदिल प्रकरणाची चौकशी करून संबंधित तालुका अधिकारी सह कर्मचारी यांच्यावर कारवाई करा अशी मागणी मा. तहसीलदार साहेब तहसील कार्यालय पाटोदा यांच्याकडे वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष सचिन मेघडंबर यांनी केली आहे

पाटोदा तालुक्यात आरोग्य अधिकारी सह पाटोदा वाहली, अंबळनेर, कुसळम नायगाव ,डोंगर किनी , दासखेड हे आरोग्य केंद्र येतात. पण तेथील अधिकारी अपडाऊन करीत आहेत कर्मचारी फक्त कधीकधी झेंडावंदनाला येतात. या सर्वांची चौकशी करून मुख्यालय न राहता घर भाडे उचलणाऱ्या व आरोग्यासारख्या गंभीर विभागात असतानाही जनतेच्या जीवाशी खेळणाऱ्या सर्व तालुका अधिकारी सह व अधिकाऱ्यांचा डॉक्टरांच्या वर कारवाई करावी नुसता वंचित बहुजन आघाडीच्या वतीने गुरुवार दिनांक २६/०६/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता तहसील कार्यालयासमोर धरणेआंदोलन करण्यात येईल असा इशारा वंचित बहुजन आघाडीचे उपाध्यक्ष सचिन मेघडंबर यांनी दिला आहे

## चौंडेश्वरी कोचिंग क्लासेसच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

वडवणी। प्रतिनिधी

वडवणी शहरातील,नामांकित चौंडेश्वरी कोचिंग क्लासेच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा व विद्यार्थी-पालक मेळाव्याला महाराष्ट्रातील प्रसिद्ध युवा व्याख्याते प्रा.राहुल गिरी यांचे व्याख्यान संपन्न.याबाबत अधिक माहिती अशी की,वडवणी शहरातील शिक्षण क्षेत्रात नामांकित असलेल्या चौंडेश्वरी कोचिंग क्लासेस च्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा व भव्य विद्यार्थी पालक मेळाव्याला प्रा.राहुल गिरी यांचे व्याख्यान रविवार दि.१५ जून २०२५ रोजी चौंडेश्वरी मंगल कार्यालय,श्रीराम मंदिर चौक, वडवणी या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वडवणी नगरपंचायतचे नगराध्यक्ष मा.श्री.भारतजी जगताप तर कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून महाराष्ट्रातील प्रसिद्ध युवा व्याख्याते प्रा.राहुलजी गिरी तसेच ह.भ.प.नवनाथ महाराज चिनके,उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे,श्रीमती वर्षा व्हगाडे मॅडम ए.पी.आय.पो.स्टे.वडवणी, क्लासेसचे संचालक तुकारामजी दिवटे सर व संचालक सुरज टोंपे सर,सौ.फासे मॅडम आदींजन मान्यवर म्हणून उपस्थित होते.

मान्यवरांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. गुणवंत विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकासह





सन्मानपत्र व बुके देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते गुणगौरव करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले तसेच उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे,श्रीमती वर्षा व्हगाडे मॅडम यांनी आपले विचार व्यक्त त्या म्हणाले की,चौंडेश्वरी कोचिंग क्लासेसने आज या ठिकाणी गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव करून त्यांच्या पाठीवर टाकलेली कौतुकाची थाप त्यांना पुढील शिक्षणासाठी प्रेरणादायी ठरेल त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण कार्यक्रमाचे उद्घाटक महाराष्ट्रातील प्रसिद्ध युवा व्याख्याते प्रा.राहुल गिरी यांचे व्याख्यान संपन्न झाले त्यांनी विद्यार्थी पालकांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले वडवणी तालुक्यामध्ये शैक्षणिक क्रांतीची मशाल पेटवण्याचे काम चौंडेश्वरी कोचिंग क्लासेसचे संचालक सुरज टोंपे सर व तुकाराम दिवटे सर करत आहेत एन.एम.एम.एस.शिष्यवृत्ती परीक्षेत त्यांच्या विद्यार्थ्यांनी बीड जिल्ह्यात रेकॉर्ड केला आहे तसेच स्कॉलरशिप परीक्षा बी.टी.एस.परीक्षा,मंथन परीक्षा,सैनिकी स्कूल परीक्षा, इयत्ता-१० वी बोर्ड परीक्षेत चौंडेश्वरी कोचिंग क्लासेस मधील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे असे ते म्हणाले त्यानंतर अध्यक्षीय समारोप पर भारतजी जगताप यांनी आपले विचार व्यक्त करताना ते म्हणाले की,ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना घडवण्याचं काम चौंडेश्वरी कोचिंग क्लासेस च्या माध्यमातून टोंपे सर व दिवटे सर करत आहेत सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे, पालकांचे, मार्गदर्शक सरांचे अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक संचालक सुरज टोंपे सर यांनी केले तर सूत्रसंचालन अमोल राठोड यांनी केले व उपस्थितांचे आभार संचालक तुकाराम दिवटे यांनी मानले. या कार्यक्रमाला गुणवंत विद्यार्थी तसेच पालक, सामाजिक,राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बहुजन समाज परिवर्तन क्रांतीत शिक्षकांचे योगदान महत्वाचे-ससाणे

कळंब। प्रतिनिधी

समाजाला वैचारिक जागृत करण्याचे काम शिक्षकाशिवाय इतर कोणीही करू शकत नाही असा ठाम विश्वास ओबीसी संघर्ष युद्धे ॲड. मंगेश ससाणे यांनी व्यक्त केला. राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाच्या राज्यस्तरीय बैठकीमध्ये सन्माननीय मंगेश जी ससाणे प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाची दुसरी राज्यस्तरीय बैठक नुकतीच पार पडली. समस्त ओबीसी बहुजन वर्गाला जागृत करून त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देण्याच्या दृष्टीने ओबीसी संघर्ष योद्धे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आरक्षणाची न्यायालयीन लढाई लढणारे, उपोषण कर्ते , अभ्यासु वकील श्री. मंगेश ससाणे यांनी ओबीसी समाजातील विध्यार्थ्यांसाठी स्थापित केलेली महाजोती या संस्थेबाबत माहिती देऊन महाज्योती च्या विविध योजना, शासनाकडून सुरू असलेल्या विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती योजना ओबीसी महामंडळ योजना याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. ओबीसी समाजातील सुशिक्षित वर्गात जाणीव जागृती झाल्याशिवाय आपल्या हक्काचे संरक्षण होणार नाही हे स्पष्ट आहे.

गेल्या दोन अडीच वर्षांत राज्यातील समाजमन ढवळून निघाले असुन अनेक कठीण प्रसंगातून ओबीसी जात आहे.यासाठी आपण एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे. समाजावर होणारे अन्याय अत्याचार उघडकीला आणुन त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न करावे लागतील असे आवाहन त्यांनी यावेळी केले. राज्यातील रोस्टर घोटाळा हा एक गंभीर प्रश्न असून अनेक प्रकरणात असे निदर्शनास आले आहे की, सर्वसाधारण प्रवर्गातुन नोकरी मिळालेली असताना सुद्धा नंतर च्या कालावधीत संबंधितांचे जात प्रमाणपत्र मागवुन घेत त्याचा जातीचा जो प्रवर्ग आहे त्या राखीव प्रवर्गात त्याचा समावेश केला असल्याचे बहुतांश जिल्ह्यातील शिक्षक बांधवांनी निदर्शनास आणून दिले. नाशिक जिल्ह्यात पेसा कायद्याचे उल्लंघन होत असल्याचे नाशिक येथील पदाधिकारी बांधवांनी सांगितले. ओबीसी प्रवर्गातील मॅट्रिक पुर्व शिष्यवृत्ती विनाअट सर्वाना द्यावी, टाळाटाळ व हयगय करणाऱ्यांना दोषी धरावे याबाबतही चर्चा करण्यात आली. पदोन्नतीत ओबीसी बांधवाना संख्येच्या प्रमाणात आरक्षण द्यावे याबाबत चर्चा करून ठराव घेण्यात आला. या सर्व बाबी शासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी दिवाळी सुट्टीत संघटनेचे राज्य स्तरीय अधिवेशन शिर्डी अथवा अलिबाग येथे घेऊन त्या अधिवेशनात मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री, बहुजन कल्याण मंत्री, ग्रामविकास मंत्री याना निमंत्रित करून त्यांना या सर्व बहुजन समाजाच्या समस्या लक्षात आणून देऊ आपण मोठ्या संख्येने या अधिवेशनात सामील व्हावे असे आवाहन प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपल्ले यांनी केले..सन्माननीय



ओबीसी योद्धे छगनराव भुजबळ साहेब यांच्या मंत्रिमंडळातील प्रवेशाबद्दल अभिनंदनाचा ठराव घेण्यात आला ..नाशिक हुन बबनराव चव्हाण,प्रशांत शेवाळे व राजेंद्र खैरनार यांनी लवकरच साहेबांचा सत्कार सोहळ्याचे नियोजन करू असे सांगितले. राज्य सरचिटणीस श्री. संतोष भोजने यांनी उपस्थित सदस्यांना मार्गदर्शन करताना राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघ हा राज्यातील सर्व शिक्षकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करत असताना जास्तीत जास्त संख्येने आजीवन सभासद बनवून संघटनेची ताकद महाराष्ट्रात निर्माण होण्यासाठी बहुजन शिक्षक या व्यासपीठावर यावेत यासाठी प्रयत्न करावेत अशी सूचना सर्व जिल्हा पदाधिकारी यांना केली. समाजातील सर्व ओबीसी./ एन. टी./ व्ही.जे. /एन. टी./ एस. बी. सी. या सर्व विद्यार्थ्यांना मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती मिळते पण याबाबत जागरूकता नसल्याने ओबीसी विध्यार्थी या योजनांपासून कोसोदूर राहतात त्यामुळे आपण जबाबदार घटक या नात्याने आपल्या जिल्ह्यातील तालुक्यातील शाळेतील सर्व विद्यार्थी यांचे प्रस्ताव सादर करून त्याचा पाठपुरावा ही करावा असे आवाहन केले.या सभेला संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपले, सरचिटणीस संतोष भोजने, उपाध्यक्ष सुखदेव भालेकर, कार्याध्यक्ष बबनराव चव्हाण, महिला प्रदेशाध्यक्ष रेखाताई सुडे, प्रसिद्धी प्रमुख सचिन गडपतवार, राज्य कोषाध्यक्ष संजय भोईर, राज्य प्रतिनिधी राजेंद्र खैरनार, हिंगोली जिल्हाध्यक्ष लहू राक्षे, लातूर जिल्हाध्यक्ष हिरालाल पाटील, धाराशिव जिल्हाध्यक्ष अनंत फुलसुंदर, खाजगी विभाग प्रमुख राजन पाटील, मनपा प्रमुख श्रीराम पळसकर, कोकण विभाग प्रमुख गोरख आघाव, मराठवाडा विभाग प्रमुख संजय मळभागे, भालचंद्र खाडे, राजेंद्र सरक, आप्पाराव शिंदे, अरुण भूकन, खंडेराव सानप, पुरुषोत्तम म्हेत्रे, भाऊसाहेब जाधव, सदाशिव भाले, काशिनाथ घाणेकर, दशरथ शिंगारे, धनंजय सरक, आप्पा खैरनार, संतोष केंद्रे,रविभाऊ गुट्टे,उमाकांत डिगे, श्रीकांत धनवट, राम जोरवर ,सचिन गणपतवार, चंद्रकांत चौरे, ज्ञानेश्वर महाजन, विनायक केंद्रे, आनंदा गांगुर्डे, ज्ञानेश्वर महाजन, भास्कर म्हात्रे, सुनील शेलार, शंकरराव मुरकुटे, नूरखा पठाण, विजय महाजन, संतोष सगर, एमडी काळे, विष्णू काळे, सुभाष पांचाळ, नामा पवार, सुधाकर अटके, सुदर्शन गिराम, सिंधू शेळके, संजय भोईर, बालाजी चेटमपल्ले, संतोष भोजने, कुंडलिक चौधरी, संकेत पांचाळ, श्रीकांत मददे, सुधाकर अटके, सोनिया जमदाडे, मंगेश सुवर्णकार, सुधाकर अटके, प्रज्वल मोहटे, जितेंद्र कुमार मानकर, रमेश खाडे, नानासाहेब गोरणे, लक्ष्मण दावणकर, परमेश्वर गलांडे, अंगद सोगे, अजित जाधव, सुभाष सानप, धनाजी घरत, प्रशांत शेवाळे, राहुल म्हेत्रे, रामदास वडीमिले, अर्जुन जाधव, मिलिंद दुधाळ, सचिन रासवे, विनया जाधव, रामराव मुरकुटे,संतोष चव्हाण आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## पणन विषयक कार्यशाळेचे श्रीहरी मोरे यांच्या हस्ते उदघाटन



माजलगाव। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ पुणे व राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था (एन.आय.पी.एच.टी. ) तळेगाव दाभाडे जि.पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१९ जुन २०२५ रोजी जिल्ह्यातील कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती, उपसभापती, संचालक मंडळ व सचिव यांचेसाठी पणन विषयक एक दिवसीय कार्यशाळेचे उदघाटन उपसभापती श्रीहरी मोरे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी माजलगाव बाजार समितीचे संचालक भगवान आगे,अमोल जाधव,नंदकिशोर सजगने,आबाजी भोसले,सचिव एच. एन.सवने, नितीन पौळ,जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी सुभाष साळवे,उपनिबंधक सचिन घोडके, उपसरव्यवस्थापक महादेव बरडे, गोपालकृष्ण परदेशी उपस्थित होते.राज्यातील बहुतांश बाजार समितीच्या निवडणुका नुकत्याच पार पडलेल्या असल्याने नवीन संचालक मंडळ कार्यरत झालेले आहे. कार्यशाळेच्या सुरुवातीला मंत्री जयकुमार रावल यांचा नुतन संचालकांसाठी शुभसंदेश भाषणाची क्लीप सर्व उपस्थितांसमोर प्रसारित करण्यात आली.जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी सुभाष साळवे यांनी बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील कृषी उत्पादने व नियमन, गोपालकृष्ण परदेशी यांनी कलम ३७ अन्वये बाजार समिती फी चा उपयोग व बाजार समितीवर आव्हाने आणि उपाययोजना, सचिन घोडके यांनी बाजार समितीचे गुणक्रमांक पध्दती, महादेव बरडे यांनी कृषि पणन विषयक विविध योजना या विषयांवर उपस्थित पदाधिका-यांना सखोल मार्गदर्शन केले.कार्यशाळेत समृत जाधव यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. कार्यशाळेसाठी महादेव बरडे, तळेगाव दाभाडे येथील अधिकारी राजेश नाफडे, अजय नागवडे, बाजीराव दगडे यांनी परिश्रम घेतले.

cmyk

# डाळिंब आणि हिरवी मिरची तेजीत, आले स्थिर; तर ज्वारी दर दबावातच

आले दर स्थिर : राज्यातील बाजारात आल्याचे भाव मागील काही आठवड्यांपासून स्थिर आहेत. आल्याच्या भावात काही वेळा चढ उतारही दिसून आले होते. आले लागडीसाठी बियाण्याची मागणी वाढल्याने दरात सुधारणा दिसून आली होती. पण बियाणे मागणी पूर्ण झाल्यानंतर दर पुन्हा काहीसे कमी झाले होते. सध्या आल्याला २५०० ते ३ हजार रुपये भाव मिळत आहे. पुढील काही आठवडे बाजारातील आवक स्थिर राहण्याची शक्यता आहे. सणांची मागणी येईपर्यंत आल्याच्या दरात काहीसे चढ उतार दिसू शकतात, अशी माहिती अभ्यासकांनी दिली.

हिरवी मिरची तेजीतच

राज्यातील बाजारात मागील काही आठवड्यांपासून हिरव्या मिरचीची आवक कमीच आहे. तर दुसरीकडे मागणी आहे. त्यामुळे दरही स्थिर दिसत आहेत. सध्या लग्न सराई आणि समारंभामुळे हिरव्या मिरचीला चांगला उठाव आहे. त्यामुळे हिरवी मिरची ३ हजार ते ३ हजार ५०० रुपयाने विकली जात आहे. हिरव्या मिरचीची आवक आणखी काही आठवडे वाढण्याची शक्यता नाही. त्यामुळे बाजारातील आवकही सरासरी राहण्याचा अंदाज आहे. त्यामुळे हिरव्या मिरचीचे दरही पुढील काही आठवडे कायम राहू शकतात, असा अंदाज व्यापारी व्यक्त करत



आहेत.

दोडका आवक घटली

बाजारीत दोडक्याची आवक मोठ्या प्रमाणात कमी झाली. तर दोडक्याला चांगला उठाव आहे. त्यामुळे दोडक्याच्या भावातही सुधारणा दिसून आली. दोडका पिकालाही सततचा पाऊस आणि ढगाळ हवामानाचा फटका बसत आहे. पिकाचे मोठे नुकसान झाल्याचे शेतकरी सांगत आहेत. आवक कमी आणि चांगली मागणी यामुळे दोडक्याचा बाजार ४ हजार ते ५ हजार रुपये प्रतिक्विंटलच्या दरम्यान पोचला. दोडक्याची आवक आणखी काही आठवडे कमीच राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे दरही टिकून राहतील, असा अंदाज व्यापारी व्यक्त करत आहेत.

डाळिंबाचे भाव तेजीतच

डाळिंबाला बाजारात सध्या चांगला उठाव आहे. बाजारातील कमी आवक आणि चांगला उठाव यामुळे डाळिंबाचे दर तेजीतच आहेत. बाजारातील आवक यंदा अपेक्षेप्रमाणे झालीच नाही. याचा आधार डाळिंबाला दराला मिळत आहे, असे व्यापारी सांगत आहेत.

सध्या बाजारात डाळिंबाला प्रतिक्विंटल सरासरी ८ हजार ते ९ हजार रुपयांच्या दरम्यान भाव मिळत आहे. डाळिंबाला बदलत्या वातावरणाचा आणि पावसाचा तडाखा बसला. त्यामुळे माल कमी आहे. पुढील काही आठवडे बाजारातील आवक कमीच राहील, असा अंदाज डाळिंब बाजारातील व्यापारी व्यक्त करत आहेत.

ज्वारीचे दर दबावातच

ज्वारीचे उत्पादन चांगले झाल्याने दरावर दबाव असल्याचे दिसत आहे. रब्बीच्या ज्वारीची बाजारात आवक सुरु झाल्यानंतर दरावर दबाव वाढला होता. दरपातळी २०० ते ३०० रुपयांनी कमी झाली होती. ज्वारीच्या दरावरील दबाव आजही कायम आहे. ज्वारीला सरासरी प्रतिक्विंटल २६०० ते २८०० रुपयांच्या दरम्यान आहेत. ज्वारीची बाजारातील आवक सध्या कमी झाली आहे. पुढील काही आठवड्यांमध्ये ज्वारीची आवक कमी होण्याची शक्यात आहे. त्यामुळे दरातही सुधारणा होऊ शकते, असा अंदाज ज्वारी बाजारातील व्यापारी व्यक्त करत आहेत.

## बियाणे, कीटकनाशके यांच्याशी संबंधित कायदे आणखी कडक करणार

### केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंग चौहान



नवी दिल्ली : विकसित कृषी संकल्प अभियानादरम्यान शेतकऱ्यांनी बियाणे व कीटकनाशके यांच्या गुणवत्तेबाबत चिंता व्यक्त केली होती. त्यामुळे आता बियाणे आणि कीटकनाशके यांच्याशी संबंधित कायदे आणखी कडक करण्यात येतील, अशी घोषणा केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी केली आहे.

कृषी सचिव देवेश चतुर्वेदी यांनी सांगितले की, कृषी मंत्रालय बनावट बियाणांबाबत काठोर कायदा करणार असून, या अंतर्गत गुन्ह्यांसाठी दंड कसा वाढवायचा यावर विचार करत आहे. बियाणे कायदा, १९६६ मध्ये एक वर्षाच्या आत योग्य ते बदल केले जातील. तसेच बनावट कीटनाशकांची विक्री रोखण्यासाठी कीटनाशक कायदा, १९६८ मध्ये सुधारणा केल्या जातील. ७२१ जिल्ह्यांच्या १.४३ लाख गावांतील १.३४ कोटी शेतकऱ्यांशी संपर्क साधला. ८,२८० शास्त्रज्ञ आणि २,१७० पथके देशव्यापी विकसित कृषी संकल्प अभियानात होती. ६०,२८१ कार्यक्रमांचे आयोजन देशभरात करण्यात आले होते. चौहान यांनी सांगितले की, आम्हाला शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात सूचना मिळाल्या. कृषीविषयक योजना आणि धोरणे ठरवताना त्यांचा उपयोग केला जाईल. प्रगतिशील शेतकऱ्यांचे उपक्रम लोकप्रिय केले जातील.

### शेतकऱ्यांच्या बांधावर जाण्याची सक्ती

चौहान यांनी सांगितले की, कृषी विज्ञान केंद्रांचे शास्त्रज्ञ आठवड्यातून तीन दिवस शेतकऱ्यांच्या शेतांना सक्तीने भेट देतील. मी आठवड्यातून दोन दिवस शेतकऱ्यांच्या शेतांवर जाईन. मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनाही अशाच सूचना देण्यात आल्या असल्याचे त्यांनी सांगितले.

## तुरीचे सुधारित वाण आणि वैशिष्टे

तूर हे खरीप हंगामातील अत्यंत महत्वाचे पीक. राज्यात सर्वसाधारपणे १२ ते १३ लाख हेक्टर क्षेत्रावर अति लवकर, मध्यम लवकर आणि मध्यम ते उशिरा कालावधीच्या वाणांची निर्मिती राज्यातील कृषि विद्यापीठांनी केली आहे. तुरीच्या अधिक उत्पादनासाठी पाऊसमान आणि जमिनीचा प्रकार लक्षात घेऊन योग्य वाणांची पेरणी करणे फायदेशीर ठरते. तुरीच्या वाणाची निवड करताना जमिनीच्या प्रकारानुसार करणे गरजेचे असते. कारण भारी जमिनीत अधिक उत्पादन देणारे तुरीचे वाण हे मध्यम ते हलक्या जमिनीत तितकेच उत्पादन देतील असे नाही. मध्यम प्रकारच्या जमिनीकरिता कमी कालावधीत परिपक्व होणाऱ्या वाणांची निवड करावी. लट भारी जमीन असेल तर मध्यम ते उशिरा कालावधीत परिपक्व होणाऱ्या वाणाची निवड करावी.



बी डी एन ७११ : मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रात कोरडवाहू लागवडीसाठी, हलक्या व मध्यम जमिनीत पेरता येणारा १५० ते १५५ दिवसात तयार होणारा ,एकाच वेळी पक्व होणारा,यांत्रिक पद्धतीने काढता येणारा शेतकऱ्यांच्या पसंतीस उतरलेला वाण.

बी डी एन ७११, गोदावरी, बी एस एम आर ८५३ : लाल/तांबड्या /तपकिरी/फिकट तपकिरी दाण्याचे वाण :फुले राजेश्वरी, फुले तृप्ती, फुले पल्लवी, बी डी एन ७०८, बी डी एन ७१६, रेणुका, बी एस एम आर ७३६, आय सी पी एल ८७, आय सी पी एल ८७११९, पी.के.व्ही तारा, पी.डी. के.व्ही .आश्लेषा,ए के.टी ८८११ .

फुले पल्लवी (फुले तूर १२-१९-२) - वैशिष्टे : मध्यम पक्वता कालावधी ,दाणे टपोरे फिकट तपकिरी ,मर व वांझ या रोगास मध्यम प्रतिकारक्षम शेंगा पोखरणारी अळी,शेंग माशी या किडींना कमी बळी, हेक्टरी उत्पादन:२१.४५ क्विं/हे.

फुले तृप्ती - वैशिष्टे : दाणे आकाराने टपोरे ,दाण्याचा रंग फिक्कट तपकिरी मार व वांझ रोगास मध्यम प्रतिकारक्षम शेंगा पोखरणारी अळी आणि शेंगमाशी या किडीचा प्रादुर्भाव कमी. हेक्टरी उत्पादन:२२-२३ क्विं/हे. फुले राजेश्वरी - वैशिष्टे : तांबड्या रंगाचे टपोरे दाणे , मर व वांझ रोगास प्रतिकारक्षम. हेक्टरी उत्पादन: २८-३० क्विं/हे. पी.के .व्ही.तारा - वैशिष्टे : दाण्याचा रंग लाल ,मर व वांझ रोगास प्रतिकारक्षम. हेक्टरी उत्पादन:१९-२० क्विं/हे. पी.डी. के.व्ही.आश्लेषा - वैशिष्टे : दाणे टपोरे आणि लाल रंगाचे,मर,वांझ, करपा आणि पानावरील ठिपके या रोगांना मध्यम प्रतिकारक्षम, जिरायत लागवडीसाठी योग्य. हेक्टरी उत्पादन :१९-२० क्विं/हे. ए के टी ८८११ - वैशिष्टे : दाण्याचा रंग लाल,मध्यम टपोरे दाणे, मर रोगास मध्यम प्रतिकारक्षम हेक्टरी उत्पादन: १०-११ क्विं/हे.

बी डी एन पी एच-१८-५ - वैशिष्टे:राज्यातील पहिला संकरित वाण,दाण्याचा रंग पांढरा,मर व वांझ रोगास मध्यम प्रतिकारक्षम. हेक्टरी उत्पादन:१८ -२२ क्विंटल /हेक्टर.


बी डी. एन ७०८ (अमोल) - वैशिष्टे : शेंगा गर्द लाल, दाणे चमकदार लाल रंगाचे, मध्यम आकाराचे, शेंगा पोखरणाऱ्या किडीस सहनक्षम. हेक्टरी उत्पादन:१६-१८ क्विंटल / हेक्टर.

बी.डी. एन ७११ - वैशिष्टे : दाणा पांढरा, हलक्या व मध्यम जमिनीस योग्य,शेंगा एकाच वेळी पक्व, यांत्रिक पद्धतीने काढता येतात,लवकर पक्व होत असल्याने रब्बीत दुबार पीक घेणे शक्य. हेक्टरी उत्पादन:१६-२३ क्विंटल /हेक्टर. याशिवय बी.डी. एन ७१६, गोदावरी (बी.डी.एन. २०१३ ४१), रेणुका, बी.एस एम आर. ७३६, बी.एस एम आर ८५३, इक्रीसॅट,हैद्राबाद विकसित वाण, आय सी पी एल ८७ ( प्रगती), आय सी पी एल ८७११९ (आशा), ही वाणही प्रसिद्ध आहेत. वरील नमूद तुरीच्या वाणाच्या बियाण्याच्या उपलब्धते संबंधित कृषी विद्यापीठ, शेतकऱ्यांच्या बीजोत्पादन कंपनी, महाबीज किंवा शासनाच्या इतर मान्यताप्राप्त कंपन्या यांच्याशी आपण संपर्क करू शकता. या संदर्भामध्ये अधिक माहिती संबंधितांकडून प्राप्त होऊ शकते. जमिनीचा प्रकार, संरक्षित ओलिताची सोय , वाणाचा परिपक्वता कालावधी व मर व वांझ रोगाचा होणारा प्रादुर्भाव या सर्व बाबी लक्षात घेऊन तुरीच्या वाणाची निवड करावी.

## वेळीच करा हळद, आल्याची लागवड

साधारणपणे आले व हळद लागवडीला अक्षयतृतीयेला म्हणजेच मे महिन्यामध्ये सुरवात होते. मात्र, गतवर्षीच्या दुष्काळी वातावरणामुळे पाण्याची कमतरता असल्याने लागवडीला उशीर होत आहे. या पिकांच्या चांगल्या उगवणीसाठी ३५ ते ४० अंश सेल्सिअस तापमानाची आवश्यकता असते. त्यामुळे या पिकांची लागवड उशिरात उशिरा १५ ते २० जूनच्या दरम्यान करावी. त्यानंतर या पिकांची लागवड केल्यास उत्पादनात घट येते. लागवडीनंतर वातावरणात उष्णता असल्यास व हवामान कोरडे असल्यास सेंद्रिय आच्छादनाचा वापर करावा. नवीन रुजणाऱ्या कंदाच्या अंकुरास इजा पोचत नाही. कोंब-अंकुर करपण्याचा धोका टळतो.

या पिकांच्या उगवणीसाठी बियाण्याच्या सुप्तावस्थेच्या कालावधीनुसार ३ ते ४ आठवडे लागतात. त्यामुळे लागवडीपासून पहिल्या पंधरवड्यामध्ये ठिबक सिंचनाद्वारे कोणतीही खते देऊ नयेत. हळदीची लागवड योग्य खोलीवर करणे आवश्यक आहे. कंदावर दोन ते तीन इंच मातीचा थर येईल, असे पाहावे. शक्यतो लागवड करण्यापूर्वी शेतास पाणी देऊन वाफशावर या पिकांची लागवड करावी किंवा लागवडीनंतर लगेच पाणी द्यावे, अन्यथा कंद मलूल पडणे किंवा गाभळण्याचे प्रमाण वाढते. कंदकुजीचा



प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. दर्जेदार उत्पादनासाठी या पिकांमध्ये शेणखताचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. त्यामुळे तणांचा प्रादुर्भावही अधिक प्रमाणात असतो. लागवडीनंतर लगेच दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी तण उगवण्यापूर्वी अ‍ॅट्रॉझीन हे तणनाशक ४ ते ५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यामध्ये घेऊन फवारणी करावी. फवारणी करताना जमीन ओलसर असणे गरजेचे आहे. लव्हाळा किंवा हराळी अशी बहुवार्षिक तणे शेतात आढळून आल्यास, लागवडीनंतर १० ते १२ दिवसांनी तण उगवल्यानंतर आणि हळद उगवण्याच्या अगोदर ग्लायफोसेट (४१ टक्के) हे तणनाशक ४ ते ५ मि.लि. प्रति लिटर प्रमाणे फवारणी करावी.

हळद उगवण्यास सुरवात झाल्यानंतर किंवा लागवडीपासून पंधरा दिवसांनंतर कोणत्याही प्रकारच्या तणनाशकांचा वापर हळदीमध्ये करू नये. पारंपरिक पद्धतीने म्हणजेच सरी वरंब्यावर हळदीची लागवड केलेल्या क्षेत्रावर उगवण पूर्ण झाल्यावर खतांची दुसरी मात्रा द्यावी. यामध्ये एकरी ८० किलो युरिया आणि शिफारशीनुसार सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर करावा. आले-हळदीमध्ये आंतरपिके घेताना पहिल्या चार महिन्यापर्यंत वाढ होतील अशा प्रकारची आंतरपिके निवडावीत. यामध्ये मिरची, झेंडू, घेवडा, सोयाबीन, तूर, एरंड इ. सारख्या आंतरपिकांचा समावेश असावा.

हळद व आले या पिकांमध्ये मका हे आंतरपीक घेऊ नये, त्यामुळे उत्पादनात घट येते. या पिकांवरील कंदकूज या रोगाच्या नियंत्रणासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून एकरी ट्रायकोडर्मा प्लस ३ किलो या प्रमाणात शेणखतात मिसळून किंवा द्रवरूप स्वरूपातील ठिबकच्या माध्यमातून द्यावा. ट्रायकोडर्मा देताना जमिनीत ओलावा असणे गरजेचे आहे.




### जागतिक दिवस
### आंतरराष्ट्रीय योग दिन
### जागतिक संगीत दिन

### महत्वाच्या घटना

१६७४ : कवीभूषण यांनी '' शिवराय भूषण '' हे काव्य पूर्ण केले.
१७८८ : न्यू हॅम्पशायर अमेरिकेचे ९ वे राज्य बनले.
१८९८ : अमेरिकेने स्पेनकडून 'ग्वाम' हा प्रांत ताब्यात घेतला.
१९४८ : पहिले भारतीय गव्हर्नर जनरल म्हणून चक्रवर्ती राजगोपालाचारी यांच्याकडे सूत्रे
१९४९ : राजस्थान उच्च न्यायालयाची स्थापना
१९५७ : एलेन फेअरक्लो यांनी कॅनडाच्या पहिल्या महिला कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेतली.
१९६१ : अमेरिकेतील शास्त्रज्ञांनी समुद्राच्या खार्या पाण्याचे गोड्या पाण्यात रुपांतर करणारे यंत्र विकसित केले.
१९७५ : वेस्ट इंडीजने पहिला क्रिकेट विश्वचषक जिंकला.
१९८९ : अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने देशाचा ध्वज जाळण्याची कृती आणि वाचा स्वातंत्र्याची अभिव्यक्ती असल्यामुळे वैध ठरवली.
१९९१ : भारताचे ९ वे पंतप्रधान म्हणून पी. व्ही. नरसिंह राव यांनी सूत्रे हाती घेतली.
१९९२ : विज्ञान, तंत्रज्ञान आणि समाजविज्ञानाच्या क्षेत्रात विशेष कार्य करणार्या डॉ. रघुनाथ माशेलकर यांना मध्यप्रदेश सरकारतर्फे जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पारितोषिक जाहीर
१९९५ : पर्यावरणक्षेत्रात विशेष कार्य केल्याबद्दल पर्यावरणतज्ञ रश्मी मयूर यांना अमेरिकेतील 'द युनिटी इन योग इंटरनॅशनल' या संस्थेने विशेष सन्मान जाहीर केला.
१९९८ : फ्रँकफर्ट बुद्धीबळ महोत्सवात विश्वनाथन आनंदने 'फ्रिट्झ-५' या संगणकाचा सहज पराभव केला.
१९९९ : विश्वकरंडक स्पर्धेत १००० धावा पूर्ण करणारा मार्क वॉ (ऑस्ट्रेलिया) हा चौथा खेळाडू ठरला.
२००९ : भारताची बॅडमिंटन स्टार सायना नेहवाल सुपर सिरीज बॅडमिंटन स्पर्धेचे विजेतेपद जिंकणारी पहिली भारतीय महिला ठरली.
२००४ : स्पेसशिपवन या पहिल्या खाजगी अंतराळयानाचे पहिले उड्डाण.
२००६ : नवीनच शोध लागलेल्या प्लूटोच्या उपग्रहांचे 'निक्स' व 'हायड्रा' असे नामकरण करण्यात आले.
२०१५ : जागतिक योग दिनाची पराक्रमी सुरवात.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७८१ : फ्रेंच गणितज्ञ आणि भौतिकशास्त्रज्ञ सिमिओन-डेनिसपॉइसॉन यांचा जन्म.
१९०५ : जेआँ-पॉल सार्त्र फ्रेन्च लेखक, कवी, तत्त्वज्ञ आणि नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: १५ एप्रिल १९८०)
१९१२ : भारतीय लेखक व नाटककार विष्णू प्रभाकर यांचा जन्म.(मृत्यू: ११ एप्रिल २००९)
१९१६ : सुरेन्द्रनाथ कोहली भारताचे ९ वे नौदल प्रमुख (मृत्यू: २१ जानेवारी १९९८)
१९२३ : सदानंद रेगे, मराठी कवी, कथाकार आणि अनुवादक.
१९४१ : भारतीय बिशप अलॉयसियस पॉल डिसोझा यांचा जन्म.
१९५२ : जेरमी कोनी न्यूझीलंडचा क्रिकेटपटू
१९५३ : बेनझीर भूट्टो पाकिस्तानच्या पंतप्रधान (मृत्यू: २७ डिसेंबर २००७)
१९५८ : भारतीय अभिनेत्री रीमा लागू यांचा जन्म. (मृत्यू: १८ मे २०१७)
१९६७ : ईबे चे स्थापक पियरे ओमिदार यांचा जन्म.
१९६७ : थायलंड देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान यिंगलक शिनावात्रा यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८७४ : स्वीडीश भौतिकशास्त्रज्ञ अँडर्सयोनास अँग्स्ट्रॉम यांचे निधन.
१८९३ : अमेरिकन उद्योगपती तसेच स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीचे संस्थापक लिलँड स्टॅनफोर्ड यांचे निधन.
१९२८ : द्वारकानाथ माधव पितळे तथा नाथमाधव, मराठी कादंबरीकार. (जन्म: ३ एप्रिल १८८२)
१९३२ : आधुनिक काळातील सर्वश्रेष्ठ ब्रजभाषा कवि जगन्नाथदास रत्नाकर यांचे निधन.
१९४० : डॉ. केशव बळीराम हेडगेवार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक व पहिले अध्यक्ष (जन्म: १ एप्रिल १८८९)
१९५७ : नोबल पारितोषिक विजेता जर्मन भौतिकशास्त्रज्ञ जोहन्नेस स्टार्क यांचे निधन.
१९७० : सुकार्नो इंडोनेशियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष (जन्म: ६ जून १९०१)
१९८४ : अरुण सरनाईक, महाराष्ट्रीयन मराठी चित्रपट अभिनेता व गायक. (जन्म: ४ ऑक्टोबर १९३५)
२००३ : लिऑन युरिस अमेरिकन कादंबरीकार (जन्म: ३ ऑगस्ट १९२४)
२०१२ : महाराष्ट्रीयन मराठी लेखक व अनुवादक तसचं, 'सह्याद्री' वृत्तपत्राचे संपादक भालचंद्र दत्तात्रय खेर यांचे निधन. (जन्म: १२ जून १९१७)
२०१२ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय अर्थशास्त्रज्ञ, नागरी सेवक अधिकारी आणि मुत्सद्दी तसचं, अमेरिकेतील भारताचे माजी राजदूत व माजी नियोजन आयोगाचे सदस्य आबिद हुसेन यांचे निधन.
२०१२ : भारतीय छायाचित्रकार आणि पत्रकार सुनील जना यांचे निधन. (जन्म: १७ एप्रिल १९१८)
२०२० : जीत सिंग नेगी (आधुनिक घरवल लोकसंगीताचे जनक, जन्म: २ फेब्रुवारी १९२५).

# कामखेड जि.प. शाळेचे नविन सुसज्ज ईमारत बांधकाम पुर्ण

## सामाजिक कार्यकर्त्यांच्या पाठपुराव्याला यश



बीड। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील कामखेड येथील निजामकालीन केंद्रीय प्राथमिक शाळा मोडकळीस आल्याने दि.१३ जुलै २०२२ रोजी इयत्ता ४ थी मधील कुंदन विजय ओव्हाळ या विद्यार्थ्यांच्या हातावर मोडकळीस आलेल्या शाळेच्या भिंतीचा कोपरा ढासळुन हात फ्रॅक्चर झाला होता. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे व सहका-यांनी शाळेला भेट देऊन ''ज्ञानमंदिरांना निधी देण्यात यावा यासाठी वारंवार आंदोलने केली होती.तत्कालीन शिक्षणाधिकारी ( प्राथमिक) जिल्हा परिषद बीड शशिकांत कुलकर्णी आणि कार्यकारी अभियंता समग्र शिक्षा अभियान जिल्हा परिषद बीड सुरेश बाहेगव्हाणकर यांनी दखल घेत प्रत्यक्ष शाळेला भेट देऊन नविन ४ खोल्यांच्या इमारतीसाठी ३६ लाख ८० हजार रूपयांचा निधी मंजूर केला होता. ३ वर्षांनंतर शाळा इमारतीचे काम पूर्ण झाले असुन आता यावर्षीपासून नविन ईमारतीत विद्यार्थी ज्ञानार्जन करत असुन विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न सामाजिक कार्यकर्ते,प्रसारमाध्यमे, ग्रामस्थांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे शिक्षण विभागाने निधी देऊन सोडवला असुन याबद्दल समाधान व्यक्त करत अखेर सामाजिक कार्यकर्त्यांच्या पाठपुराव्याला यश मिळाल्याचे डॉ . गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी म्हटले आहे.

बीड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या २४७४ शाळा असून यात २४१५ शाळा प्राथमिक तर ५९ शाळा माध्यमिक आहेत. जिल्ह्यातील ११ तालुक्यातील ३४९ शाळांच्या ५९२ खोल्या धोकादायक असून पावसाळ्यात मोठा पाऊस अथवा वादळवारा आल्यास धोका निर्माण होऊ शकतो. जिल्हा परिषदेच्या शाळांच्या इमारतीची दुरावस्था असून कुठे भिंती कुजलेल्या अवस्थेत, तर कुठे छत पडलेले तर कुठे दरवाजे खिडक्या मोडकळीस आलेल्या अवस्थेत आहेत. गेल्या अनेक वर्षापासून शाळावर्ग खोल्यांची दुरुस्ती आवश्यक असताना लोकप्रतिनिधी व प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष असल्याने तसेच वेळेवर उपलब्ध निधी उपलब्ध न झाल्याने शालेय मुलांचे अडचण होत असून दुर्घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाकडून विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ सुरू आहे त्यामुळे तातडीने धोकादायक शाळांच्या दुरुस्तीसाठी निधी देण्यात येऊन तात्काळ दुरुस्त करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे. जवळपास १०० पेक्षा जास्त विद्यार्थी पटसंख्या असलेली निजामकालीन शाळा मोडकळीस आली होती.२०२२ मध्ये शाळेच्या भिंतींचा कोपरा ढासळुन विद्यार्थी जखमी झाला होता.यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे, सरपंच, ग्रामस्थांनी पाठपुरावा केल्यानंतर शाळेला निधी मिळाला आणि सुसज्ज अशी इमारत बांधण्यात आली असुन विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न मिटला असल्याचे सहशिक्षिका चव्हाण एम.एस. यांनी सांगितले.

सन २०२२ मध्ये कुंदन ओव्हाळ विद्यार्थ्यांच्या अंगावर भिंतींचा कोपरा कोसळुन जखमी झालेल्या विद्यार्थ्यांची आठवण सांगताना जुन्या शाळेत वर्गात बसायला भिती वाटायची शाळा अंगावर पडती की काय? आता शाळा नविन झाली त्यामुळे आम्हाला आनंद वाटतो अशी प्रतिक्रिया आरजु शेख विद्यार्थीनीने डॉ.गणेश ढवळे यांच्याशी संवाद साधताना दिली. बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील मोडकळीस आलेल्या वर्ग खोल्यांच्या ठिकाणी नवीन वर्गखोल्यांचे बांधकाम करणे व इमारत विरहित शाळांना वर्गखोली उपलब्ध करून देणे.याबाबत प्रशासनाने शासन स्तरावरून पाठपुरावा करून निधी उपलब्ध करून घेऊन ब-याच ठिकाणी वर्गखोल्यांची बांधकामे पुर्णत्वास आलेली आहेत.कामखेडा येथील निजामकालीन ईमारत पाडुन त्याठिकाणी राजमाता जिजाऊ शैक्षणिक गुणवत्ता विकास अभियान अंतर्गत नविन टुमदार ४ वर्गखोल्यांची रूपये ३६ लाख ८० हजार रूपयांच्या ईमारतीचे बांधकाम पुर्णत्वास आलेले असुन विद्यार्थी आनंदाने भितीविरहीत शिक्षण घेत असल्याची प्रतिक्रिया कार्यकारी अभियंता समग्र शिक्षा अभियान जिल्हा परिषद बीड सुरेश बाहेगव्हाणकर यांनी दिली.

# राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त डॉ.प्रल्हाद लुलेकर यांचे व्याख्यान

### मान्यवरांना पुरस्कार, गुणवंतांचा गुणगौरव



अंबाजोगाई। प्रतिनिधी

येथील आधार मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या वतीने छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक न्याय दिन व आर्थिक साक्षरता अभियान राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर डॉ.प्रल्हाद लुलेकर यांचे व्याख्यान, विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देऊन सन्मानित करणे तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ गुरूवार, दिनांक २६ जून २०२५ रोजी आयोजित करण्यात आला असल्याची माहिती आधार मल्टीस्टेटचे चेअरमन ऍड.सुनील सौंदरमल यांनी दिली. हा समारंभ गुरूवार, दिनांक २६ जून २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता अंबाजोगाई येथे आधार मल्टीस्टेटच्या आधार भवन 'अजिंठा हॉल' मध्ये आयोजित करण्यात आला आहे.

यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगरचे माजी मराठी विभागप्रमुख तथा ज्येष्ठ साहित्यिक डॉ.प्रल्हाद लुलेकर यांचे 'डॉ.बी.आर.आंबेडकर यांनी छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती सणा प्रमाणे साजरी करा असे का म्हटले होते' या विषयावर व्याख्यान होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जेष्ठ साहित्यिक तथा खोलेश्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे हे भूषविणार आहेत. या समारंभात समाजसेवा पुरस्कार - ऍड.संतोष पवार (आधार माणुसकीचा), उत्कृष्ट प्रशासन अधिकारी पुरस्कार - दीपक वजाळे (उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई), विद्याभूषण पुरस्कार - कार्डिओलॉजिस्ट डॉ.दीपक कटारे (अंबाजोगाई, लातूर) , उद्योगभूषण पुरस्कार - प्रकाश प्रताप मर्लेचा (संचालक, प्रेरणा ड्रेसेस, अंबाजोगाई) यांना तर उत्कृष्ट साहित्य पुरस्कार - प्रा.डॉ.देविदास खोडेवाड (खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई) या मान्यवरांना जाहीर करण्यात आले आहेत. या पुरस्कारांचे वितरण ही गुरूवार दिनांक २६ जुन रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगरचे मराठी विभागप्रमुख तथा ज्येष्ठ साहित्यिक डॉ.प्रल्हाद लुलेकर यांच्या हस्ते केले जाणार आहे. अशी माहिती चेअरमन ऍड.सुनील सौंदरमल यांनी दिली. आधार मल्टीस्टेट ही सहकार क्षेत्रातील काम करणारी अग्रगण्य संस्था आहे. ही केवळ अर्थ सेवा करीत नसून अर्थ क्षेत्रा बरोबरच समाजसेवेचे व्रत ही या संस्थेने अंगीकारले आहे. मागील १३ वर्षांपासून ही संस्था सामाजिक उपक्रमात नेहमीच अग्रेसर राहिलेली आहे. आजपर्यंत आधार मल्टिस्टेटच्या माध्यमातून विविध क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जवळपास ४० मान्यवरांना सदरील पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. तसेच इयत्ता दहावी आणि बारावी तसेच इतरही अनेक क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट गुण मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांचाही मान्यवरांच्या हस्ते सन्मान केला जाणार आहे. मल्टिस्टेटच्या वतीने दरवर्षी महिलांसाठी जागतिक महिला दिनाच्या औचित्याने महिलांचा सन्मान केला जातो. मकर संक्रांतीनिमित्त हाळदी - कुंकवाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. तसेच होतकरू महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी बचत गटाच्या माध्यमातून कर्ज उपलब्ध करून देऊन त्यांना स्वयंरोजगार निर्मिती करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातात. सर्व महापुरूषांची जयंती तसेच शहरात नवीन आलेले अधिकारी यांचा सन्मान करणे, त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकणे आणि राष्ट्रीय एकात्मता जोपासण्यासाठी या संस्थेच्या माध्यमातून प्रयत्न केले जातात. याच सामाजिक उपक्रमाचा एक भाग म्हणून या वर्षी देखील गुरूवार, दिनांक २६ जून रोजी विविध मान्यवरांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार असल्याचे ऍड.सुनील सौंदरमल यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

# जिल्हाभरात योग दिन : मोठ्या संख्येने उपस्थित रहाण्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे आवाहन

बीड। प्रतिनिधी

जिल्हयात दि. २१ जून २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्यात आले असून जिल्हा क्रीडा संकुल, जालना रोड, बीड येथे सकाळी ६.३० वाजता या कार्यक्रमास अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी, योग साधक, विद्यार्थी, युवक युवती, नागरीक आदींनी सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे. तालुकास्तरावरून देखील मोठ्या प्रमाणात आयोजन करण्यात येणार आहे. सदर नियोजनासाठी प्रशासनाबरोबरच पतंजली योगपीठ, योगा असोसिएशन, योगा संघटना आणि विविध सामाजिक संस्था सहभागी होणार आहेत.

संयुक्त राष्ट्रसंघाने २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केलेला आहे. पाच हजार वर्षांपासून अधिक परंपरा असणारी योग विद्या ही भारताने जगाला दिलेली देगणी असून व्यक्तीच्या शारिरीक आणि आत्मिक विकासासाठी योग विद्या सहाय्यभूत ठरते. जागतिक योग दिनाचे आयोजन करताना देशभर व जगातील विविध देशात देखील याचे कायक्रम केले जातात. यामध्ये सकाळी ६.३० ते ८.०० या कालावधीत सामूहीक योगाची प्रात्यक्षिके करणे आणि त्याबाबत जनजागृती घडवून सर्वसामान्य व्यक्तीस याचे महत्त्व पटवून देणे, यासाठी हा दिवस महत्त्वाचा ठरतो. यामुळे जिल्हयामध्ये देखील योग दिनानिमित्त समाजातील सर्व स्तरावरील महिला, पुरुष, युवक-युवतींनी यामध्ये सहभाग घ्यावा. योग दिनाच्या पुर्वतयारी बाबत बैठक जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी बैठकीस अपर जिल्हाधिकारी हरिश धार्मिक, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, माध्यमिक शिक्षणाधिकारी संजय पंचगल्ले, उपशिक्षणाधिकारी एन.जी. हजारे, ए. बी. खेडकर, जिल्हा आयुष अधिकारी आनंद लिमकर, पतजंली योगपीठाचे जिल्हा प्रमुख ॲड. श्रीराम लाखे, जिल्हा योगा असोसिएशनचे सचिव विनायक वझे, क्रीडा संघटक तथा शिवछत्रपती राज्य पुरस्कारार्थी प्रा. जे.पी. शेळके, डॉ. अविनाश बारगजे, योगगुरू विकास गवते, भागवत वाघ, मयुरेश गावस्कर, क्रीडा अधिकारी अनकेत काळे, कालिदास होसूरकर, क्रीडा मार्गदर्शक सतिश राठोड, अविनाश पाटील, रेवननाथ शेलार, जितेंद्र आराक आदी उपस्थित होते. तालुक्याच्या ठिकाणी योग दिनाचे आयोजन करताना तहसिलदार नोडल अधिकारी म्हणून, गटविकास अधिकारी हे सह नोडल अधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी हे सहाय्यक नोडल अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत. ग्रामीण भागातील तालुक्याचे ठिकाण आणि बीड शहराचे ठिकाण वगळता इतर गावांमधील शालेय विद्यार्थी व नागरिकांसाठी त्या त्या गावामध्ये तसेच शाळा, विद्यालये, महाविद्यालये या ठिकाणी योग दिनाचे आयोजन करावे बाबत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आवाहन केले आहे.

# बीडकरांशी नाळ तुटू देणार नाही - डॉ. पूनम भालेराव

बीड। प्रतिनिधी



शहराच्या सुकन्या डॉ. पूनम भालेराव यांना कौटुंबिक कारणामुळे बीड येथील दवाखाना बंद करून पुणे येथे स्थायिक व्हावे लागले. यामुळे बीडकर एका चांगल्या त्वचा सौंदर्य तज्ञाच्या सेवेपासून वंचित राहणार की काय अशी शंका उपस्थित होत होती परंतु या शंकेला आता पूर्णविराम देत दस्तूरखुद्द डॉ. पूनम भालेराव यांनी म्हटले आहे की, बीड सोडले तरी बीडकरांशी नाळ तुटू देणार नाही. प्रत्येक महिन्याच्या एक रविवारी रुग्ण तपासणीसाठी हमखास बीडला भेट देऊन रुग्ण तपासणी करणार आहे. यामुळे महिन्यातून एक दिवस का होईना त्वचा सौंदर्य तज्ञ असलेल्या डॉ. पुनम भालेराव यांची सेवा बीडच्या रुग्णांना मिळणार आहे.

डॉ. पूनम भालेराव या येत्या रविवार दिनांक २२ जून रोजी सकाळी ११:०० ते संध्याकाळी ०४:०० पर्यंत रुग्णांचे पिंपल्स (मरूम), वांग, चेहऱ्यावरील सुरकुत्या, डोळ्याखालील काळे डाग, कोरडी त्वचा, नखांचे आजार, गजकर्ण, पांढरे डाग (कोड), सोरियासिस, स्ट्रेच मार्क (व्रण), त्वचेचे सर्व आजार, सनटेन ट्रीटमेंट, स्कीन टायटनिंग, केस गळती, केसातील कोंडा, केसांची वाढ खुंटणे, हायड्रोफेशियल, मायक्रो नीडलिंग, पी.आर.पी. (केसांसाठी व त्वचेसाठी), शरीरावरील अनावश्यक केसांसाठी उपचार, टॅटू-गोंदण, केमिकल पिलिंग, मस-चामखीळ इत्यादींची तपासणी करणार आहे. याकरिता रुग्ण ८०८०९७३५९८/९०७५ ८६२६८६ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधून नाव नोंदणी करू शकतात. डॉ. पूनम भालेराव या बीड शहरातील शिवाजीनगर परिसरात नवगण कॉलेज समोरील जानकी मेडिकल येथे रुग्णांची तपासणी करणार आहेत.

# जयमहेश कारखान्यामार्फत गोड ज्वारी लागवड प्रशिक्षण शिबिर



माजलगाव। प्रतिनिधी

एन एस एल शुगर लिमिटेड युनिट ३ जय महेश पवारवाडी ,एन एस आय कानपूर, ऍडव्हान्टा कंपनी, आय.सि.ए.आर-आय.आय.एम.आर,बी.पी.सि.एल.यांच्या संयुक्त विद्यमानाने महाराष्ट्रातील पहिलाच व्यावसायिक प्रकल्प अंतर्गत गोड ज्वारी लागवड प्रशिक्षण कार्यक्रम दिनांक १९ जुन गुरुवार रोजी घेण्यात आला त्यामध्ये कंपनीच्या वतीने पुढील प्रमाणे माहिती/प्रशिक्षण शेतकऱ्यांना देण्यात आली गोड ज्वारी लागवड प्रशिक्षण कार्यक्रमानिमित्त पंचक्रोशीतील ३०० शेतकऱ्यांनी यामध्ये सहभाग नोंदवला.

ॲडव्हान्टा कंपनीचे मुख्य प्रतिनिधी पांडुरंग पाटील यांनी स्वीट स्वारगम गोड ज्वारी लागवडी विषयी सखोल माहिती दिली यामध्ये त्यांनी ज्वारी लागवड पद्धत कीड व रोग नियंत्रण अंतर मशागत तसेच पाण्याचे व्यवस्थापन याबद्दल सर्व शेतकऱ्यांना माहिती सांगितली एन एस एल शुगर्स लिमिटेड जयमहेश पवारवाडी कारखान्याचे जनरल मॅनेजर पारसनाथ जयस्वाल यांनी गोड ज्वारीपासून इथेनॉल निर्मिती होणार आहे याबाबत माहिती सांगितली या ज्वारीपासून शेतकऱ्यांना उत्पन्न देखील चांगले मिळते हे पीक ९० ते १०० दिवसाचेच असून शेतकऱ्यांनी याचा फायदा घ्यावा व ए.जी.एम. दत्तात्रय आहेरकर, ऊस पुरवठा अधिकारी रामभाऊ सोळंके,भास्कर फपाळ यांनी देखील गोड ज्वारी लागवडी संदर्भातील माहिती शेतकऱ्यांना दिली व उपस्थित शेतकऱ्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या व त्यावर त्यांना माहिती दिली अशा प्रकारे खेळीमेळीच्या वातावरणात चांगला कार्यक्रम पार पडला

# प्रा.गौतम गायकवाड यांच्या ग्रंथास राज्यस्तरीय ग्रंथ पुरस्कार

## २२ जुन रोजी पुणे येथे मान्यवरांच्या हस्ते वितरण


अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील प्रवर्तनवादी चळवळीतील आघाडीचे लेखक उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांच्या 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि आंबेडकरी साहित्य (आकलन आणि अवलोकन)' या ग्रंथास सन २०२३-२०२४ या सालासाठी दिला जाणारा राज्यस्तरीय 'महात्मा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ' प्रथम पुरस्कार जाहीर झाला आहे. या बाबतचे पत्र त्यांना नुकतेच प्राप्त झाले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल उपप्राचार्य प्रा.गायकवाड यांचे सर्वस्तरांतून अभिनंदन होत आहे.

यापूर्वी प्रा.गायकवाड यांच्या 'व्हि.जे.आरक' या ग्रंथास राज्यस्तरीय तृतीय, 'प्रज्ञासुर्याचे सुर्यपुत्र' या ग्रंथास राज्यस्तरीय प्रथम, 'बुध्द प्रबुद्ध विचारांच्या पाऊलखुणा' या ग्रंथास सन-२०२५ साठी दिला जाणारा राज्यस्तरीय 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकॅडमी' तृतीय पुरस्कार आणि 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि आंबेडकरी साहित्य (आकलन आणि अवलोकन)' या ग्रंथास सन-२०२२ साठी दिला जाणारा राज्यस्तरीय 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकॅडमी' द्वितीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. एकाच संस्थेचे सलग चार पुरस्कार उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांना मिळाले आहेत. ही विशेष उल्लेखनीय बाब आहे. उपप्राचार्य प्रा.गायकवाड हे आंबेडकरी चळवळीतील आघाडीचे लेखक, कवी आणि विचारवंत आहेत. त्यांच्या समग्र व उल्लेखनीय कारकिर्दीची दखल घेत महात्मा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ पुरस्कार आणि विचार प्रसारक संस्था, पुणे यांचे अध्यक्ष ऍड.एल.टी.सावंत, जनरल सेक्रेटरी प्रा.आर.आर.सोनकांबळे आणि ग्रंथ पुरस्कार निवड समितीचे चेअरमन डॉ.दिपक गायकवाड यांनी या बाबत नुकतेच कळविले आहे. त्यानुसार या पुरस्काराचे वितरण रविवार, दिनांक २२ जुन २०२५ रोजी सायंकाळी ५ ते ८ या वेळेत इतिहास संशोधन मंडळ, भरत नाट्य मंदिराशेजारी, सदाशिव पेठ, पुणे येथे प्रमुख अतिथी दयानंद माने (निवासी संपादक, दैनिक सकाळ वृत्तपत्र मिडिया, पुणे) यांच्या हस्ते व माजी आमदार ऍड.एल.टी.सावंत यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित एका विशेष समारंभात करण्यात येणार आहे. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून डॉ.प्रकाश पवार (उपप्राचार्य, फर्ग्युसन कॉलेज, पुणे) हे असणार आहेत. या समारंभात उपप्राचार्य प्रा.गौतम केरबा गायकवाड (प्रथम क्रमांक), जयराम सदाशिव खुने (द्वितीय क्रमांक) आणि बाबुराव नामदेव धांडोरे (तृतीय क्रमांक) या लेखकांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. मागील ३५ वर्षांपासून महात्मा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ पुरस्कार आणि विचार प्रसारक संस्था, पुणे या संस्थेच्या वतीने सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच भारतीय लोककल्याण कार्य आणि चळवळीबद्दल संस्था कार्यरत राहून पुरोगामी विचार प्रसार व प्रसारासाठी संस्था कार्यरत आहे. मागील अनेक वर्षांपासून म.फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करणाऱ्या लेखकांकडून दिलेल्या पत्त्यावर ग्रंथ मागवून अभ्यासू व्यक्तिंकडून त्याचे परीक्षण करून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक काढून पुरस्कार जाहीर व प्रदान केला जातो. अशा उत्कृष्ट लेखकांना मान्यवरांच्या हस्ते राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. सन २०२३-२४ या सालासाठीचे प्रथम पुरस्कार प्राप्त प्रा.गौतम गायकवाड यांना यापुर्वीही डॉ.जगजीवनराम लेखक पुरस्कार (नेपाळ), प्रेरणा समीक्षा पुरस्कार (पुणे), समाजभुषण पुरस्कार (सोलापुर), उत्कृष्ट लेखक पुरस्कार (लातूर) आणि व्ही.जे.आरक या ग्रंथास राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. उपप्राचार्य प्रा.गायकवाड यांचे २२ हून अधिक पुस्तके, विविध वृत्तपत्र, नियतकालिकांतून नियमित प्रासंगिक लेखन, दहा पेक्षा अधिक ग्रंथांचे संपादन, त्यांनी केले आहे. या सोबतच सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि धार्मिक कार्यात त्यांचा सक्रीय सहभाग राहिला आहे. अनेक चर्चासत्रात सहभाग घेत विविध नियतकालिकांतून त्यांचे सव्वा तिनशेहून अधिक लेख प्रकाशित झाले आहेत. नवोदित साहित्यिक, कवी यांना प्रोत्साहन देण्याचे तसेच त्यांच्या ग्रंथ प्रकाशनासाठी प्रसंगी सर्वोतोपरी भरीव सहकार्य करण्याचे कार्य देखिल प्रा.गायकवाड यांनी वेळोवेळी केले आहे. व्ही.जे.आरक सेवाभावी संस्था आणि परिवर्तन साहित्य मंडळाचे ते अध्यक्ष ही आहेत. तसेच 'परिवर्तन संशोधन' मासिकाचे कार्यकारी संपादक आहेत. परिवर्तन साहित्य संमेलनाच्या आयोजनात त्यांचा पुढाकार आहे. आगामी काळात ११ विविध विषयांशी संबंधीत ग्रंथ, काव्य संग्रह, प्रवर्तनवादी चळवळीला बळ देणाऱ्या ग्रंथाचे लेखक म्हणून ही ते ओळखले जातात. या सर्व विषयांवरील त्यांच्या विविध ग्रंथसंपदा या प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. उपप्राचार्य प्रा.गौतम केरबा गायकवाड हे सध्या अंबाजोगाईतील खोलेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य आणि मराठी भाषा विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. मागील ३३ वर्षांपासून ते अध्यापनाचे कार्य करीत आहेत. त्यांनी नाटक, कथा, कविता, प्रासंगिक, संशोधन, संपादन, आंबेडकरी चळवळ संदर्भाने विपुल ग्रंथ व साहित्य संपदा निर्मिली आहे. त्यांना आता 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि आंबेडकरी साहित्य (आकलन आणि अवलोकन)' या ग्रंथास सन २०२३-२०२४ या सालासाठी दिला जाणारा राज्यस्तरीय 'महात्मा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ' प्रथम पुरस्कार जाहीर झाला आहे. त्याबद्दल उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांचे सामाजाच्या सर्वस्तरांतून अभिनंदन होत आहे.



# शहरातील मुख्य रस्त्यावर वाहनांची गर्दी करणाऱ्यांना पोलिसांकडून तंबी



अंबाजोगाई प्रतिनिधी

दोन दिवसांपूर्वी अंबाजोगाईत पोलीस अधीक्षकाकडून जनसंवाद बैठक घेण्यात आली त्या बैठकीत अंबाजोगाईतील प्रतिष्ठित व सर्वसाधारण नागरीकांकडून वाहतुकीचा प्रश्न मांडण्यात आला होता त्याबाबत माननीय अधीक्षक साहेबांनी अंबाजोगाई शहर व ग्रामीण पोलीस स्टेशन यांना शहरातील वाहतुकीबाबत सूचना दिल्यानंतर आज रोजी अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनचे पीआय जोगदंड सर व त्यांची टीम रस्त्यावर उतरून वाहनधारकांना फुटपाथ वरच्या समोर असलेल्या छोट्या मोठ्या व्यावसायिकांना ऑटोरिक्षावाल्यांना तंबी दिली व हे सांगण्यात आले की आम्ही दोन दिवस आपणास तोंडी सांगू व नंतर कायदेशीर कारवाही करण्यात येईल दोन दिवसापासून अंबाजोगाई शहर वाहतूक पोलिसांची शहरात वर्दळ वाढल्यामुळे रस्त्यावर वाहने लावणाऱ्यांची संख्या बऱ्यापैकी कमी झालेली दिसून आली त्याच बरोबर रस्त्याच्या कडेला छोटे व्यावसायिक आपल्या दुकानासमोर गाडीवाल्यांना गाडीलावू नये अशी विनंती करत आहेत. याबाबत अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनचे पीआय जोगदंड यांनी आमच्या दैनिक रणझुंजार च्या अंबाजोगाई प्रतिनिधी बोलताना मनाले बीड जिल्ह्याचे अधीक्षक नवनीत कावत सरांनी जे आदेश आम्हाला दिलेत त्या आदेशाचे पालन अंबाजोगाई तिल सर्व नागरिकांनी करावे व पोलिसांकडून आपल्यावर कारवाई होणार नाही याची दक्षता घ्यावी यावेळी अंबाजोगाई शहरातील नागरिकांना समजावून सांगण्यासाठी पीआय जोगदंड, एपीआय घुगे, एपीआय कांबळे, पीएसआय घोडके, पोलीस कॉन्स्टेबल, चादर,कॉन्स्टेबल लाड, रोडे, राठोड, आदी कर्मचारी उपस्थित होते

cmyk

राज्य लोकतंत्र

शनिवार, दि.२१ जुन २०२५


# समाजासाठी काहीतरी चांगले करण्याची जाणीव ठेवून काम केले पाहिजे -डॉ. वैद्य



**खोलेश्वर महाविद्यालयात एकदिवसीय कार्यशाळा संपन्न**

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था ही वेगळे ध्येय घेऊन काम करणारी संस्था आहे. काही संघ स्वयंसेवकांनी स्थापन केलेली ही संस्था त्यांच्याच प्रेरणेने आजही राष्ट्रनिर्मिती करण्याचे कार्य करत आहे. त्यांचाच आदर्श समोर ठेवून आपणही समाजासाठी काहीतरी चांगले कराण्याचे व्रत घेतलेले आहे याची जाणीव ठेवून आपण काम केले पाहिजे असे प्रतिपादन भा.शि.प्र.संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य यांनी केले. येथील खोलेश्वर महाविद्यालयात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी आयोजित आचारसंहिता विषयक कार्यशाळेत उद्घाटक म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य व महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष रामभाऊ कुलकर्णी, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य उमेश जगताप, संस्थेचे मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा. चंद्रकांत मुळे , खोलेश्वर शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह किरण दादा कोदरकर , प्राचार्य डॉ. दीपक फुलारी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी दीप प्रज्वलन व देवी सरस्वतीचे पूजन करण्यात आले.

पुढे बोलताना डॉ. हेमंत वैद्य म्हणाले की, समाज मनावर चांगले संस्कार करण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. समाजामध्ये स्वदेशाविषयी, स्वसंस्कृती विषयी अभिमान बाळगून विद्यार्थ्यांमध्ये तो रूजावा यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. यासाठी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून पुढे गेले पाहिजे असे त्यांनी सांगितले. या चर्चासत्राच्या प्रथम सत्रात डॉ. दीपक फुलारी यांनी महाविद्यालयाची आचारसंहिता या विषयाची मांडणी केली. विषय मांडणी करत असताना ते म्हणाले की, वर्तनाची संकलित नियमावली म्हणजे आचारसंहिता. एखाद्या संस्थेतील कर्मचाऱ्यांनी कसे वर्तन करावे , काय टाळावे हे आचारसंहितेच्या माध्यमातून कळत असते. आचारसंहिता म्हणजे त्या संस्थेच्या संस्कृतीचा आरसा असतो. असे सांगून त्यांनी महाविद्यालयीन आचारसंहिता याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात संस्थेची आचारसंहिता या विषयाची मांडणी खोलेश्वर शैक्षणिक संकुलाच्या स्थानिक व्यवस्था समितीचे कार्यवाह किरण कोदरकर यांनी केली. विषय मांडत असताना ते म्हणाले की, स्वातंत्र्यानंतर भारतीयत्वाचा विचार समाजामध्ये रुजला पाहिजे यासाठी आपली शिक्षण संस्था उभारली गेली. येथील परंपरांची,मूल्यांची जाणीव विद्यार्थ्यांना व्हावी , राष्ट्रीय विचारांची पिढी तयार व्हावी व राष्ट्रीय चारित्र्य निर्माण व्हावे यासाठी आपण कायम प्रयत्नशील असले पाहिजे असे प्रतिपादन त्यांनी केले.तृतीय सत्रात संस्थेचे मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा. चंद्रकांत मुळे यांनी प्रशासकीय आचारसंहिता या विषयाची मांडणी केली. विषय मांडणी करताना ते म्हणाले की, विद्यार्थ्याला अभ्यासाची गोडी लागावी यासाठी शिक्षकांनी विशेष प्रयत्न केले पाहिजेत व विद्यार्थ्यांना आपल्या सहवासात आणले पाहिजे. सहवासातून अनौपचारीकरित्या विद्यार्थी अनेक गोष्टी शिक्षकाकडून शिकत असतात. असे सांगून त्यांनी महाविद्यालयीन प्रशासनात कोणत्या कोणत्या फाइल्स कशा पद्धतीने अद्ययावत ठेवल्या पाहिजेत तसेच विषयी कशा पद्धतीने तयारी केली पाहिजे याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात रामभाऊ कुलकर्णी म्हणाले की, समाजाला वेगवेगळ्या क्षेत्रातील चांगले उच्च कोटीचे मनुष्यबळ पुरविण्याचे कार्य भारतीय शिक्षण प्रसारक संस्था आजमितीपर्यंत करते आहे. संस्थेचे जे देशभक्त, चारित्र्यवान नागरिक घडविण्याचे उद्दिष्ट आहे त्यासाठी हा ज्ञानदानाचा यज्ञ अविरतपणे चालू आहे त्यामुळे यात प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून काम केले पाहिजे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. या कार्यशाळेतच संस्थेचे मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा.चंद्रकांत मुळे यांना नवभारत वृत्तपत्र समूहाच्या वतीने देण्यात येणारा 'नवभारत एज्युकेशन अवार्ड' प्राप्त झाल्याबद्दल आणि त्यांची बीड शहरातील नामांकित चंपावती शिक्षण संस्थेच्या सभापती पदी निवड झाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा. गौतम गायकवाड यांनी केले तर सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. बिभिषन फड यांनी केले. कार्यक्रमाचे आभार उपप्राचार्य प्रा.आनंद पाठक यांनी मानले तर वैयक्तिक पद्य व शांती मंत्र प्रा. शैलेश पुराणिक यांनी सादर केले. या कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.



## वारकरी दिंड्यांचे पोलीस प्रशासनाकडून पाली येथे स्वागत

बीड । प्रतिनिधी

पाली येथील नागनाथ मंदिर येथे पंढरपूर जाणाऱ्या वारकरी भाविक भक्तांसाठी अखंड अन्नछत्र व प्रथमोपचार उद्घाटन सोहळा संपन्न झाला. या उद्घाटन सोहळ्यासाठी ह.भ.प.महादेव महाराज चाकरवाडीकर तसेच बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ, मारुती खेडकर,तसेच पाली ग्रामस्थ राहुल नवले, बाबासाहेब नवले, वैजीनाथ नवले, जालिंदर नवले, अनिल साळुंके, मधुकर नवले यांची उपस्थिती होती. पान २ वर

## महिलोन्नतीसाठी शिक्षण आवश्यक

### सय्यद यांचे महिला आयोगाच्या बैठकीत प्रतिपादन

**अंबाजोगाई प्रतिनिधी**

**येथे १७ जून २०२५ रोजी राज्य महिला आयोगाच्या वतीने आयोजित उच्चस्तरीय आढावा बैठकीत महिलांच्या समस्या आणि उपाययोजनांवर सखोल विचारमंथन झाले. मराठवाड्याच्या आठही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक, महिला व बालकल्याण अधिकारी तसेच विविध महिला संघटना उपस्थित होत्या.**



ग्रामीण विकास मंडळाचे अध्यक्ष सय्यद एस.बी. यांनी महिलांच्या प्रश्नांवर ठोस भूमिका मांडली. त्यांनी ऊसतोड कामगार महिलांच्या स्थलांतरामुळे शिक्षण, आरोग्य, बालविवाह, बळजबरी गर्भपात, गर्भपिशवी काढणे यांसारख्या गंभीर समस्यांकडे लक्ष वेधले. महिलांना मोफत व दर्जेदार शिक्षण, गावाजवळ वसतिगृहे, आरोग्य सेवा, बिनव्याजी पतपुरवठा, व्यवसाय प्रशिक्षण आणि कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी हे उपाय सुचवले. अश्लील चित्रपट व अनैतिक व्यापारावर कठोर कारवाईची मागणी त्यांनी केली. ''महिलांना शिक्षण, आत्मविश्वास आणि सामाजिक समानता मिळाली पाहिजे,'' असे ठाम मत त्यांनी व्यक्त केले. या मांडणीला सर्व उपस्थित मान्यवरांनी भरभरून प्रतिसाद दिला. अध्यक्षांनी जिल्हास्तरावर नियमित बैठक घेण्याच्या सूचना केल्या. बैठकीचा दिवस महिलोन्नतीसाठी निश्चितच मोलाचा ठरल्याचे प्रतिपादन करण्यात आले.

## केएसके काकू कृषी महाविद्यालयांच्या कृषीदूतांनी शेतकऱ्यांना पटवून दिले 'कृषी ॲप'चे महत्त्व!



कामखेडा । प्रतिनिधी

शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्यासाठी आणि शेतीत 'कृषी ॲप'च्या वापराची माहिती देण्यासाठी कामखेडा येथे आयोजित प्रात्यक्षिक उपक्रमाला आज उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सौ के.एस.के काकू कृषी महाविद्यालयाच्या कृषीदूतांनी शेतकऱ्यांना कृषी ॲपचा वापर कसा करावा, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. गावकऱ्यांनी या उपक्रमात उत्साहाने सहभाग घेतला.या उपक्रमात शेतकऱ्यांना कृषी ॲपद्वारे हवामान अंदाज, पीक व्यवस्थापन, बाजारभाव, शेतीविषयक योजना आणि तज्ज्ञांचा सल्ला यासारख्या सुविधांचा लाभ कसा घ्यावा, याबाबत प्रात्यक्षिकाद्वारे माहिती देण्यात आली. कृषीदुतांनी शेतकऱ्यांना ॲप डाउनलोड करणे, नोंदणी करणे आणि त्याचा दैनंदिन शेतीत वापर कसा करावा, याचे साधे-सोपे प्रशिक्षण दिले.उपक्रमाला महाविद्यालयाचे सहसचिव डॉ. जी. व्ही. साळुंखे सर, प्राचार्य डॉ. एस. पी. मोरे सर, कार्यक्रम समन्वयक प्रा. डॉ. एस. टी. शिंदे सर, प्रा.बी बी. तांबोळकर सर.प्रा.पी.बी मांजरे सर,प्रा. डॉ. पी. ए. गायकवाड मॅडम, प्रा. बी.आर.चादर मॅडम , डॉ जी.एम.बोडखेसर आणि उपक्रमाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. एस.एस.राठोड सर ,यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी शेतकऱ्यांना डिजिटल तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेतीत उत्पादकता आणि नफा कसा वाढवता येईल, यावर प्रकाश टाकला. ग्रामस्थांनीही कृषीदूतांच्या सादरीकरणाचे आणि ॲपच्या सुलभतेचे विशेष कौतुक केले.हा उपक्रम शेतकऱ्यांना डिजिटल युगाशी जोडण्यासाठी आणि शेतीत तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर वाढवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरला. भविष्यात अशा आणखी उपक्रमांचे आयोजन करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. यावेळी कृषीदूत: व्यंकटेश कदम, युवराज खाडे, किशोर मलपुरे, योगेश कुटे, ऋतिक सोनार, श्रीकृष्ण शिंदे आणि फारुक शेख उपस्थित होते.

## जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांचा पदाधिकाऱ्यांकडून सत्कार



गेवराई । प्रतिनिधी

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांनी शहरातील न्यू निसर्ग हॉटेल येथे सदिच्छा भेट देवून विविध विषयांवर चर्चा केली. यावेळी त्यांचे शिवसेनेचे माजी तालुकाप्रमुख राजेंद्र बेदरे यांनी स्वागत केले. यावेळी शिनूभाऊ बेदरे, दिलीप गिरे, आबा गायकवाड, शंकर वैद्य, आकाश गिरे, माऊली बेदरे, ओम गायकवाड, नंदकुमार जोगदंड सह आदी शिवसैनिक उपस्थित होते.

गेवराई येथील शिवसेनेचे माजी तालुकाप्रमुख राजेंद्र बेदरे यांच्या हॉटेल न्यू निसर्ग येथे जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांनी सदिच्छा भेट देवून यावेळी त्यांनी शिवसेनेच्या पक्षवाढी संदर्भात चर्चा करुन अनेक नव्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. दरम्यान यावेळी त्यांचे तालुक्यातील शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले. यावेळी शहरातील शिवसेनेचे निष्ठावंत कार्यकर्ते उपस्थित होते.



**शिवसेना भवन मुंबई या ठिकाणी जिल्हाप्रमुखांची बैठक पार पडली. या वेळी शिवसेना प्रवक्ते तथा मुंबई पदवीधर मतदार संघाचे आमदार अनिल परब यांची जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी भेट घेतली. आगामी निवडणुका, पक्ष संघटन यावर सविस्तर चर्चा झाली. त्यांचा सत्कार करतांना बीड शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम, संपर्क प्रमुख परशुराम जाधव, नवनाथ प्रभाळे, सतीश परदेशीं.**

## सरपंच मयूर आंधळे यांचा विद्यार्थ्यांसाठी आगळा-वेगळा शालेय उपक्रम

**विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत; दर्जेदार शालेय साहित्याचे मोफत वाटप**





वडवणी । प्रतिनिधी

अवघ्या दोन दिवसांपूर्वीच यंदाच्या शालेय वर्षाला सुरुवात झाली आहे. शाळेच्या पहिल्या दिवशी येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांचे गुलाबाचे फुल देऊन स्वागत केले आहे. तर या जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांना मोफत व दर्जेदार शालेय साहित्याचे वाटप करत आदर्श सरपंच मयूरशेठ आंधळे यांनी शालेय साहित्याचा उपक्रम हाती घेत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्याला बळ देण्यास काम केले असल्याने विद्यार्थ्यांनी देखील आनंद व्यक्त केला आहे.

सन २०२५ ते २०२६ या शैक्षणिक वर्षाला दि.१६ जून वार सोमवार पासून सुरुवात झाली आहे. तर शासनापुढे देखील जिल्हा परिषद शाळा टिकवणे एक आव्हान बनले असल्याचे पहावयास मिळत आहे. याला अपवादात्मक वडवणी तालुक्यातील एकमेव पुनर्वसित गाव म्हणून मौजे रुई गावचा नाम उल्लेख होतो. या गावचे प्रमुख तथा आदर्श उच्चभूषित सरपंच मयूरशेठ आंधळे यांनी गावातील प्रत्येक विद्यार्थ्यांचे प्रवेश गावच्या जिल्हा परिषद शाळेतच घ्यावे असे आव्हान केले. या आव्हानाला देखील ग्रामस्थांमधून प्रचंड प्रतिसाद मिळाला आणि या ठिकाणी पाल्याचे प्रवेश घेतेले. तर यंदाच्या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे गुलाबाचे पुष्पगुच्छ देत प्रत्येक विद्यार्थ्याचे मनोभावे पान २ वर

## समीर मुजावर यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन

अंबाजोगाई - प्रतिनिधी



बीड येथून आंबेजोगाई शहर पोलीस स्टेशनला बदली होऊन आलेले समीर मुजावर यांचे आज सकाळी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले.

बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी जिल्ह्यातील पोलिसांची मलिन झालेली प्रतिमा सुधारण्याच्या उद्देशाने मागील महिन्यात २६ मे रोजी जिल्ह्यातील ६०३ पोलीस कर्मचाऱ्यांच्या एकाच वेळी ते कार्यरत आसलेल्या तालुक्याच्या बाहेर बदल्या करुंन पोलीस खात्या मध्ये बॉम्ब उडवून दिला.

या बदलीने पान २ वर

## शिवसेनेचे सईद खान यांचा माजलगावात विविध कार्यक्रमाने वाढदिवस साजरा

माजलगाव । प्रतिनिधी





शिवसेना अल्पसंख्यांक चे प्रदेशाध्यक्ष सईद खान यांचा शिवसेना माजलगाव च्या वतीने विविध कार्यक्रमाने वाढदिवस साजरा करण्यात आला.

शिवसेना नेते महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विश्वासू शिवसेनेचे अल्पसंख्यांक प्रदेशाध्यक्ष सईद खान यांचा वाढदिवस राज्यभर उत्साहात साजरा करण्यात आला असून माजलगावातही शिवसेनेच्या वतीने दर्ग्यास चादर अर्पण करून दीर्घ आयुष्य लाभावे अशी प्रार्थना पान २ वर

## आष्टी शहरातील बाजार तळ,मुख्य रस्त्यालगतच्या अनधिकृत दारू विक्रेत्यांवर कारवाई करावी

**तहसीलदारांचे पोलीस निरीक्षकांना पत्र**

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी शहरातील बाजारतळ, मच्छी मार्केट आणि मुख्य रस्त्यालगत सुरू असलेल्या अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर प्रतिबंधक कारवाई करून अनुपालन अहवाल सादर करावा असे पत्र तहसीलदार वैशाली पाटील यांनी पोलीस निरीक्षक आष्टी यांना दिले आहे.. त्यामध्ये म्हटले आहे की, आष्टी शहरातील बाजारतळ, मच्छी मार्केट भागात अनेक दुकाने असून खरेदीसाठी नागरिक गर्दी करत असतात त्याच ठिकाणी काही अनधिकृत अवैध दारूची दुकाने थाटली दिसून येत आहेत या अनधिकृत दुकानांमुळे मद्यपी दिवसभर या ठिकाणी ठाण मांडून रेंगाळत बसून भांडण वाद निर्माण करत आहेत

हा मुख्य रस्ता असल्यामुळे येथून शालेय विद्यार्थी, विद्यार्थिनी, महाविद्यालयीन विद्यार्थी, महिला तसेच इतर जनसामान्यांसाठी बस स्थानकाकडे जाणारा सोयीचा रस्ता आहे

त्यामुळे या ठिकाणी काही अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे अवैध दारूस प्रतिबंध करण्यासाठी स्थापन केलेल्या तालुकास्तरीय समितीचे पोलीस निरीक्षक हे सचिव आहेत त्यामुळे त्यांनी तात्काळ या अनधिकृत दारू विक्री करत असलेल्या दुकानदारांवर प्रतिबंधात्मक कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल सादर करावा असे या पत्रात म्हटले आहे.. आष्टी पोलीस स्टेशनच्या वार्षिक तपासणीसाठी पोलीस अधीक्षक नवनीत हे आष्टीत येत असतानाच अशा प्रकारचे पत्र प्राप्त झाल्यामुळे पोलीस विभाग काय कार्यवाही करत आहे याची आष्टीवासीय नागरिकांना उत्सुकता आहे.

## राजू एडके यांनी पदभार स्वीकारला



जालना । प्रतिनिधी

जालन्याचे समाज कल्याण विभागाची सहायक आयुक्त अनंत कदम यांच्या बदलीनंतर परभणीचे आयुक्त, समाज कल्याण, विभागाचे श्री राजू एडके यांना

सहायक आयुक्त, समाज कल्याण, जालना विभागाचे अतिरिक्त चार्ज देण्यात आला यावेळी त्यांनी आज पदभार स्वीकारला यावेळी त्यांचे अभिनंदन करण्यात आले यावेळी पोलीस पाटील गोविंद पाखरे यांच्यासह कर्मचाऱ्यांनी समाज कल्याण अधिकारी श्री एडके यांचे अभिनंदन केले

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# श्री तुकोबा आणि माऊलींच्या पालख्यांचे पुण्यात भक्तीमय स्वागत; भाविकांची रस्त्यावर दुतर्फा गर्दी !

पुणे : आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे निघालेल्या संत श्री तुकाराम महाराज आणि संत श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्यांचे आज पुणे शहरात आगमन होत आहे. तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा जुन्या मुंबई पुणे रस्त्यामार्गे आणि ज्ञानेश्वर महाराज यांचा पालखी सोहळा संगमवाडीमार्गे पुण्यात येत आहे. दोन्ही पालख्यांच्या स्वागतासाठी दुपारपासून पुणेकर नागरिकांनी रस्त्याच्या दुतर्फा गर्दी केली आहे.

आता तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा वाकडेवाडी येथील दुपारचा विसावा घेऊन पाटील इस्टेटमार्गे पुण्यात येत आहे, तर संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचा संगमवाडी येथे आता विसावा आहे. तुकोबांची पालखी मार्गस्थ झाल्यावर माऊलींची पालखी देखील पाटील इस्टेटमार्गे पुण्यात येईल.





दरम्यान, संगमवाडी येथील विसाव्याच्या ठिकाणी भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावल्या आहेत.आगमनानंतर तुकोबांच्या पालखीचा मुक्काम नाना पेठेतील निवडुंगा विठ्ठल मंदिरात आणि माऊलींच्या पालखीचा मुक्काम भवानी पेठेतील पालखी विठोबा मंदिरात असेल.

पुणेकरांचा उत्साह

आषाढी वारी हा पुण्याचा सांस्कृतिक आणि धार्मिक वारसा आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही पुणेकरांनी तुकोबा आणि माऊलींच्या स्वागतासाठी उत्साह दाखवला आहे. स्थानिक स्वयंसेवी संस्था, मंडळे आणि नागरिकांनी पालखी मार्गावर पाणी, अल्पोपहार आणि विश्रांतीची व्यवस्था केली आहे. तुकोबा आणि माऊलींच्या दर्शनाने मनाला शांती मिळते. ही वारी आमच्या संस्कृतीचा आत्मा आहे, असे भाव एका स्थानिक भाविकाने व्यक्त केले.

माऊलींच्या पालखी सोहळ्यात सापडलेला १० तोळे सोन्याचा गोफ केला परत

मुंबई येथील भाविक शैलेंद्र पाटील यांची १० तोळे वजनाची सोन्याची चैन चोरट्याने चोरण्याचा प्रयत्न केला. चोरट्याचा हा प्रयत्न अयशस्वी ठरला आणि चैन खाली पडली. ही चैन आळंदी येथील भाजप शहराध्यक्ष किरण येळवंडे यांच्या पत्नी कांचन येळवंडे यांना सापडली. त्यांच्यासोबत त्यांच्या नणंद सविता आहेर, धनश्री प्रगळे आणि मोहिनी वाघ या महिलाही उपस्थित होत्या.

कांचन यांनी तातडीने दिघी पोलीस ठाण्यात जाऊन चैन जमा केली. याचवेळी शैलेंद्र पाटील तक्रार नोंदवण्यासाठी पोलीस ठाण्यात पोहोचले होते. हरवलेली चैन परत मिळाल्याने त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला. माऊलींनीच कांचन यांच्या रूपात येऊन माझी चैन मिळवून दिली, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

# भोर तालुक्यात पावसाची पुन्हा दमदार हजेरी; पेरणी केलेल्या शेतातच पाणी

**भोर । प्रतिनिधी**

**भोर तालुक्यात अवकाळी पावसाच्या विश्रांतीनंतर खरीप हंगामातील रखडलेल्या मशागतीच्या कामाला सुरुवात करुन खरीप हंगामातील पिकांच्या पेरणीला लगबग करत शेतकऱ्यांनी दोन ते तीन दिवसात बहुतांश पेरणी केली. मात्र, त्यानंतर पावसाने सलग पाच ते सहा दिवसांपासून जोरदार सुरुवात केली आहे. परिणामी, पेरणी केलेल्या शेतात पाणी साचले, भात तरवे पाण्याखाली बुडाले तर मशागत केलेल्या जमिनीचा वाफसा गेला. त्यामुळे बहुतांश शेतजमीन पेरणीविना रखडल्याने खरीप हंगाम वाया जाण्याची चिंता शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे.**




मागील आठवड्यात पेरणी केलेली पिके सध्या उगवण होऊन जोमात येऊ लागली आहेत. मात्र, उगवलेल्या पिकांमध्ये पाणी साचल्याने पिके वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांना लागून राहिली आहे. एकीकडे मागील १५-२० दिवसांपूर्वी पाऊस थांबेना, म्हणून अडचणीत आलेला शेतकरी पावसाच्या विश्रांतीनंतर थोड्या फार प्रमाणात खरीप हंगामातील पेरणी केल्यानंतर सध्या पाऊस थांबेना म्हणून अडचणीत आल्याने हवालदिल झाला आहे.

शेतकरी पाऊस थांबण्याच्या प्रतीक्षेत असला तरी पाऊस थांबत नसल्याने खरीपातील पिकांच्या पेरण्या होणार की नाही ? ,या द्विधा अवस्थेत आहे. पावसाने उघडीप दिली तर पुढील पाच ते सहा दिवसात उर्वरित खरीप हंगामातील पिकांच्या पेरण्या होण्याची शक्यता असल्याचे शेतकऱ्यांकडून सांगण्यात आले. मात्र, पाऊस थांबलाच नाही, तर कडधान्य पेरणी होणार नाही. परिणामी, बियाणे विकत घेण्याची परिस्थिती नसतानाही बहुतांश शेतकऱ्यांनी एकमेकांकडून उसने पिसे घेऊन विकतचे आणलेले कडधान्याचे बियाणे घरात पडून राहणार असल्याने शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान होणार आहे.

# वजराई धबधब्यावर तरुणांची स्टंटबाजी; प्रतिबंधित क्षेत्रात तरुणांची घुसखोरी

पुणे । प्रतिनिधी

भारतातील सर्वात उंच वजराई धबधब्यावर पर्यटन हंगाम सुरू झाल्यापासून काही उत्साही पर्यटक जीव धोक्यात घालून थेट धबधब्याच्या कड्यावर पोहोचत असल्याचे प्रकार समोर येत आहेत. प्रशासनाने स्पष्टपणे बंदी घातलेल्या या भागात काही तरुण जुन्या पायवाटेने घनदाट जंगलातून जाऊन थेट धबधबा कोसळतो तिथपर्यंत पोहचत आहेत.



भांबवली गावाच्या संयुक्त वनव्यवस्थापन समिती आणि वनविभागाच्या सहकार्याने या ठिकाणी पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या सुविधा उभारण्यात आल्या आहेत.

धबधब्यापर्यंत पोहोचण्यासाठी दोन किलोमीटरच्या पायवाटेवर लाल दगड टाकून मजबूत मार्ग, बसण्यासाठी पॅगोडा आणि पायऱ्यांचा परिसर विकसित करण्यात आला आहे. मात्र, पायऱ्यांच्या शेवटी कुंपण घालून पुढील मार्ग बंद करण्यात आला आहे.तरीही काही तरुण जुनी पायवाट वापरून धोकादायक जंगलातून थेट धबधब्याजवळ जात आहेत. या भागात तीव्र उतार, खोल दऱ्या, विंचू, जळवा, जंगली प्राणी आणि दगड कोसळण्याचा धोका कायम आहे. यामुळे कोणताही अपघात घडल्यास गंभीर परिणाम होऊ शकतो.

वनविभागाने प्रतिबंधित भागात जाणाऱ्यांवर २००० दंडाची चेतावणी दिलेली असली तरी ती दुर्लक्षित केली जाते. काही वर्षांपूर्वी काही पर्यटक धबधब्याच्या नादात जंगलात हरवले होते, त्यांचा ठावठिकाणा दुसऱ्या दिवशी लागला होता. स्थानिक प्रशासन व व्यवस्थापन समितीने अनेकदा आवाहन करूनही काही पर्यटक या सूचना पाळत नाहीत. त्यामुळे भविष्यात एखादा गंभीर अपघात घडल्यास याची जबाबदारी कोणाची, हा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

नदीपात्रात अंघोळ करणाऱ्या तरुणांना पोलिसांचा दणका

राज्यभरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे नद्या, ओढे आणि नाले भरून वाहत आहेत. अशा परिस्थितीत प्रशासनाने नागरिकांना सुरक्षित राहण्याचे आणि नदीपात्रापासून दूर राहण्याचे आवाहन केले आहे. मात्र काही नागरिक प्रशासनाच्या सूचनांकडे दुर्लक्ष करून जीव धोक्यात घालतात.पुण्यात असाच प्रकार समोर आला असून, पावसाने तुडुंब भरलेल्या नदीपात्रात अंघोळ करणाऱ्या काही तरुणांना पोलिसांनी चांगलाच धडा शिकवला. या तरुणांना दिलेल्या शिक्षेचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. पुणे जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून जोरदार पावसाचा अंदाज कायम असून, नद्यांमधील पाणीपातळी झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून नागरिकांनी नदीपात्रात उतरणे, फोटोग्राफी किंवा अंघोळीसारख्या कृती टाळाव्यात, असे आवाहन केले आहे.

# पूर नियंत्रणासाठी उजनी धरणातून ११६०० क्युसेसचा विसर्ग; उजनीने जून महिन्यात गाठली ऐतिहासिक ७० टक्क्यांची पाणीपातळी

दौंड । प्रतिनिधी

पुण्यातील मुसळधार पावसामुळे उजनीकडे येणाऱ्या पाण्याचा विसर्ग ६६ हजार ८३१ क्युसेक झाला आहे. त्यामुळे उजनी धरणाच्या इतिहासात पहिल्यांदाच धरण जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात ७० टक्क्यांपेक्षा जास्त भरले आहे. धरणात १०० टीएमसी पेक्षा अधिक एकूण पाणीसाठा आहे. त्यामुळे जुलै महिन्यामध्ये भीमा नदीला महापुराची भीती व्यक्त होत आहे. त्याच अनुषंगाने आषाढी सोहळ्यात संभाव्य पूर परिस्थिती टाळण्यासाठी शुक्रवार, २० जून रोजी सायंकाळी पाच वाजता उजनी धरणातून भीमा नदीत वीज निर्मितीद्वारे १६०० क्युसेक तर सांडव्याद्वारे १६ दरवाजे उचलून १० हजार



क्युसेक एकूण ११६०० क्युसेस ने पाणी सोडण्यास सुरुवात केली आहे.

उजनी धरणातील एकूण साठा सध्या १०० टीएमसी इतका आहे, त्यापैकी ३६.५८ टीएमसी हा उपयुक्त पाणीसाठा आहे. विशेष म्हणजे, केवळ गेल्या पाच दिवसांतच साठ्यात ११ टीएमसीने वाढ झाली आहे. १ जूनपासून आतापर्यंत उजनी पाणलोट क्षेत्रात ६८ मिमी पावसाची नोंद झाली आहे. गतवर्षीच्या तुलनात्मकदृष्ट्या पाहता, गेल्या वर्षी याच दिवशी (२० जून २०२४) उजनी धरणाची पाणीपातळी केवळ ४६.७१ टक्के होती. यंदा ती १० टक्क्यांनी अधिक असून, १०४ टक्के अधिक पाणीसाठा आहे, म्हणजेच सध्या धरण भरून येण्याचा वेग मागील वर्षाच्या तुलनेत दुपटीहून अधिक आहे.

दरम्यान आषाढी यात्रेवरचे संभाव्य महापुराचे सावट तसेच शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात होणारे नुकसान टाळण्यासाठी कालव्याद्वारे उजनी धरणातून पाणी सोडण्याची मागणी होत आहे.

उजनी धरणाची पाणी पातळी,आज स ६ वा. उजनी धरण

पाणी पातळी - ४९५.३०० मीटर

एकूण पाणीसाठा - १००.२४ टीएमसी

उपयुक्त पाणीसाठा- ३६.५८ टीएमसी

टक्केवारी - ६८.२८ टक्के

यादी विसर्ग - ११, ६०० क्युसेक

दौंड आवक ६६ हजार ८३१ क्युसेक

हेही वाचा : वजराई धबधब्यावर तरुणांची स्टंटबाजी; प्रतिबंधित क्षेत्रात तरुणांची घुसखोरी

दौंड मधून गुरुवारी रात्री १०९३८ क्युसेस विसर्ग सुरू होता. शुक्रवारी सकाळी सहा वाजता ५८५८५ क्युसेस होता त्यात दुपारी वाढ होत, सायंकाळी सहा वाजता ६६८५० क्युसेसने पाणी दौंडमधून मिसळत आहे. त्यात रात्रीत घट होण्याची शक्यता आहे.

# नेरे विभाग नागरी सहकारी पतसंस्थेच्या आर्थिक व्यवहारात गैरव्यवहार; ४० कोटींची फसवणूक

भोर: येथील नेरे विभाग नागरी सहकारी पतसंस्थेच्या आर्थिक व्यवहारात गैरव्यवहार करून ठेवीदारांच्या एकूण ४० कोटींची फसवणूक केल्याप्रकरणी संस्थेचे तत्कालीन संचालक मंडळ, व्यवस्थापक, सचिव यांच्यासह कर्जदारावर बुधवारी (दि. १८) भोर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. सहकारी संस्था पुणे लेखापरिक्षक वर्ग २ चे जयसिंग सखाराम गायकवाड यांनी याबाबत भोर पोलिसांत फिर्याद दिली.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, नेरे विभाग नागरी सहकारी पतसंस्थेच्या २५ जून २०१० ते ३१ मार्च २०२४ पर्यंतच्या आर्थिक व्यवहारात तत्कालीन संचालक मंडळ, सचिव, व्यवस्थापक यांनी संस्थेच्या निधीचे बेकायदेशीरपणे पोटनियमबाह्य पुस्तकी नोंदी करून असुरक्षित तारणांवर व विनातारण उचल करून संगनमताने ठेवीदारांची ३९ कोटी ८७ लाख ९७ हजार ७१७ रुपयांची फसवणूक,








अपहार, अफरातफर व बेकायदेशीर गैरव्यवहार करून संस्थेला आर्थिक तोट्यात आणण्याचे काम केले असल्याने रितसर आरोपींविरुद्ध कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात आला.

यामध्ये तत्कालीन अध्यक्ष भास्कर बाबूराव किंद्रे (रा. बालवडी), तत्कालीन उपाध्यक्ष सूर्यकांत बबन शिंदे (रा. बाजारवाडी), तत्कालीन संचालक श्रीधर रघुनाथ किंद्रे (रा. बालवडी), रघुनाथ बाबूराव भोसले (रा. पाले), विजय गोविंद खळदकर (रा. नेरे), सुनील शिवाजी म्हस्के (रा. पळसोशी), अजित तुकाराम गायकवाड (रा. बालवडी), श्रीमती उषा सुरेश तांगडे (रा. माझगाव), छाया गोकुळ फणसे (रा. बालवडी), सचिव सोपान हरिभाऊ सावले (रा. नेरे), व्यवस्थापक रामचंद्र गणपती मांढरे- भोर शाखा (रा. नेरे), रंजना शशिकांत किंद्रे- धनकवडी शाखा (रा. बालवडी), चंद्रकांत शंकर सरपाले- वेल्हे शाखा (रा. वेल्हे), रवींद्र विठ्ठल कुडले- नसरापूर शाखा (रा. करंजे) याच्यासह कर्जदार व पतसंस्था संचालक मंडळ मिळून एकूण ११२ जणांवर गुन्हा दाखल झाला आहे.तब्बल ४० कोटींची फसवणूक, अपहार, अफरातफर व गैरव्यवहार करून संस्थेला आर्थिक नुकसान करीत ठेवीदारांची फसवणूक केल्यामुळे कर्जदारामध्ये धावपळ उडाली आहे.

सहकारी संस्थेचा ताळेबंद

नेरे विभाग नागरी सहकारी संस्थेच्या ताळेबंदानुसार आजतागायत ठेवी ३० कोटी, कर्ज ३० कोटी, संचित तोटा ४ कोटी २५ लाख, व्याज १० कोटी आणि सभासद संख्या ३ हजार ४२५ अशी आहे.

नेरे विभाग नागरी सहकारी पतसंस्थेची फसवणुकीची व्याप्ती मोठी असल्यामुळे वरिष्ठाच्या आदेशानुसार गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करून केला जाईल.

- आण्णासाहेब पवार, पोलिस निरीक्षक भोर

# माऊलींच्या पालखी सोहळ्यात सापडलेला १० तोळे सोन्याचा गोफ केला परत

आळंदी : श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे आषाढी वारीसाठी आज पंढरपूरच्या दिशेने पुणे मुक्कामाकडे प्रस्थान झाले. या पवित्र सोहळ्याला निरोप देण्यासाठी आळंदी येथील हजारो भाविकांनी गर्दी केली होती. मात्र, या गर्दीत मॅगझीन चौक, दिघी येथे एक धक्कादायक घटना घडली.

कळंबोली, मुंबई येथील भाविक शैलेंद्र पाटील यांची १० तोळे वजनाची सोन्याची चैन चोरट्याने चोरण्याचा प्रयत्न केला. चोरट्याचा हा प्रयत्न अयशस्वी ठरला आणि चैन खाली पडली. ही चैन आळंदी येथील भाजप शहराध्यक्ष किरण



येळवंडे यांच्या पत्नी कांचन येळवंडे यांना सापडली. त्यांच्यासोबत त्यांच्या नणंद सविता आहेर, धनश्री प्रगळे आणि मोहिनी वाघ या महिलाही उपस्थित होत्या. कांचन यांनी तातडीने दिघी पोलीस ठाण्यात जाऊन चैन जमा केली. याचवेळी शैलेंद्र पाटील तक्रार नोंदवण्यासाठी पोलीस ठाण्यात पोहोचले होते. हरवलेली चैन परत मिळाल्याने त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला. माऊलींनीच कांचन यांच्या रूपात येऊन माझी चैन मिळवून दिली, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

कांचन येळवंडे यांच्या प्रामाणिकपणाचे आणि तत्परतेचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. पालखी सोहळ्यासारख्या पवित्र प्रसंगी अशी प्रामाणिकता समाजासमोर आदर्श ठरली आहे. दिघी पोलिसांनीही या घटनेची नोंद घेत कांचन यांचे आभार मानले.या घटनेने आषाढी वारीच्या पवित्र वातावरणात प्रामाणिकपणा आणि विश्वास यांचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. शैलेंद्र पाटील यांनी कांचन यांचे विशेष आभार मानले आणि माऊलींच्या कृपेने हा चमत्कार घडल्याचे सांगितले.

# बॅंडेड क्वीन कल्याणी देशपांडे अखेर गजाआड!

पिंपरी: पुणे-पिंपरी परिसरात बॅंडेड क्वीन म्हणून कुप्रसिद्ध असलेल्या कल्याणी ऊर्फ जयश्री उमेश देशपांडे हिला अखेर अमली पदार्थ विरोधी पथकाने आंध्र प्रदेशातून जेरबंद केले. तिच्यावर वेश्याव्यवसाय, खून, पिटा, मोका, फसवणूक यांसारख्या गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. ईस्ट गोदावरी जिल्ह्यातील राजनगरम येथे लपून बसलेली असताना पोलिसांनी तिला ताब्यात घेतले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २४ मे २०२५ रोजी पाषाण-सुस रोडवरील मकल्याणी कलेक्शनफ या दुकानावर अमली पदार्थ विरोधी पथकाने छापा टाकला. दुकानातून २० हजार ७३६ किलो गांजा (किंमत ११ लाख २७ हजार ७०० रुपये), मोबाईल आणि रोख रक्कम जप्त केली.

याप्रकरणी बावधन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईत कल्याणीचा पती उमेश देशपांडे (वय ५६), चुलत जावई अभिषेक रानवडे (३२), आणि पुतणी ऐश्वर्या रानवडे (२२) यांना अटक करण्यात आली होती. मात्र, मुख्य सूत्रधार कल्याणी देशपांडे ही फरार होती. दरम्यान,



वरिष्ठ पोलिस निरीक्षक संतोष पाटील आणि सहायक निरीक्षक विक्रम गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करण्यात आले. स्थानिक खबर्यांकडून माहिती मिळवत तांत्रिक विश्लेषण करून कल्याणी आंध्र प्रदेशात असल्याची माहिती समोर आली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने राजनगरम येथे जाऊन तिला अटक केली.

...यांनी केली कारवाई

वरिष्ठ पोलिस निरीक्षक संतोष पाटील, सहायक निरीक्षक विक्रम गायकवाड, पोलिस अंमलदार जावेद बागसिराज, मयूर वाडकर, शिल्पा कांबळे आणि गणेश कर्पे यांच्या पथकाने ही यशस्वी कारवाई केली.कल्याणी देशपांडे ही केवळ अंमली पदार्थ विक्रीसह अनेक गंभीर गुन्ह्यांमध्ये सक्रिय आहे. यापूर्वी ती वेश्याव्यवसाय चालवण्यासाठी कुप्रसिद्ध होती. पोलिस अधिकार्यांचे आदेश धाब्यावर बसवत तिने अनेक वेळा वेश्याव्यवसाय सुरू ठेवला. तिच्यावर डेक्कन, कोथरूड, चतुःश्रृंगी आणि हवेली पोलिस ठाण्यांमध्ये खून, पिटा ॲक्ट, मकोका, फसवणूक यांसारख्या गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. कल्याणीच्या अटकेमुळे गुन्हेगारी टोळ्यांमध्ये खळबळ उडाली असून, आणखी काही गुन्ह्यांचा उलगडा होण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.